गुरुवार, ३० जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३४३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग
खारघर टेकडीवर अडकलेल्या दोन तरुणांची सुटका/३
वरंध घाटामध्ये दरड कोसळून एक जखमी/५
रोहित शर्मा कसोटी सामन्याला मुकणार/८

# मविआ सरकार कोसळले!

## उद्धव ठाकरे यांचा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा



### विधान परिषदेचे सदस्यत्वही सोडले

मुंबई : प्रतिनिधी

**उद्धव ठाकरे यांनी बुधवारी (दि. २९) मुख्यमंत्रिपदाचा आणि त्याचबरोबर आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे गेले काही दिवस सुरू असलेल्या सत्तानाट्याला पूर्णविराम मिळाला आहे. त्यामुळे अखेर अडीच वर्षाच्या कालावधीनंतर महाविकास आघाडी सरकार कोसळले.**

**▌ एकनाथ शिंदेसह आमदार आज होणार मुंबईत दाखल**

**▌ कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवून बहुमत सिद्ध करण्याचे आदेश दिले होते. त्याविरोधात शिवसेनेने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यानंतर विशेष प्रकरण म्हणून याबाबत तातडीने सुनावणी घेण्यात आली, मात्र सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेसह 'मविआ'ला धक्का देत बहुमत सिद्ध करण्याबाबत सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर उद्धव ठाकरे यांनी फेसबुक लाईव्ह राजीनामा देत असल्याचे जाहीर केले.

आठवडाभरापासून शिवसनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करून गुवाहाटी येथे मुक्काम केला होता. शिंदे यांना शिवसेना व अपक्ष असे मिळून सुमारे ५५ आमदारांनी पाठिंबा दर्शविला, तसेच शिवसेनेच्या चार मंत्र्यांनीही त्यांना पाठिंबा दिला. त्यामुळे 'मविआ' सरकार अल्पमतात गेले होते.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या प्रमुख नेत्यांनी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची मंगळवारी (दि. २८) भेट घेतली. या भेटीमध्ये भाजपने एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या आमदारांनी बंड केल्यामुळे महाविकास आघाडी सरकार अल्पमतात असून लवकरात लवकर बहुमत चाचणी घ्यावी, अशी मागणी केली. त्यानंतर राज्यपालांनी ठाकरे सरकारला बहुमत सिद्ध करण्याबाबत पत्र लिहिले. त्याविरोधात शिवसेनेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने सायंकाळी 'मविआ' सरकारला धक्का देत बहुमत सिद्ध करण्यास सांगितले. त्यानंतर तातडीने उद्धव ठाकरे यांनी फेसबुक लाइव्ह करीत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत असल्याचे जाहीर केले.

### भाजप सत्तास्थापनेचा दावा लवकरच करणार!

**विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या प्रमुख नेत्यांनी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेऊन बहुमत चाचणी घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार आता भाजप पुन्हा एकदा महाराष्ट्रात सत्ता स्थापनेचा दावा लकवरच करणार आहे.**

# अखेर नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव

## सर्वपक्षीय कृती समिती आणि भूमिपुत्रांच्या लढाईला मोठे यश



पनवेल : रामप्रहर वृत्त

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा हेका कायम ठेवणारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय संघर्ष समिती व भूमीपुत्रांच्या लढाईमुळे अखेर माघार घेत आज मंत्री मंडळाच्या बैठकीत दि. बा. पाटील यांच्या नावाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून भूमिपुत्र आणि लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने उभारलेल्या लढ्याला मोठे यश आले आहे, अशी प्रतिक्रिया बुधवारी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आली, तसेच यावेळी पेढे वाटप करून आनंद साजरा करण्यात आला. (पान २ वर..)

# ओबीसींच्या समस्या सोडविण्यासाठी भाजप कटिबद्ध

## ■ ओबीसी मोर्चा महामंत्री खासदार संगमलालजी गुप्ता यांची ग्वाही

(छाया : लक्ष्मण ठाकूर)




पनवेल : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ओबीसी समाजावर अन्याय झाला आहे, मात्र लवकरच भारतीय जनता पक्ष येथे सत्तेवर आलेले दिसेल. त्यामुळे ओबीसी समाजाच्या समस्या तातडीने सोडविल्या जातील, अशी ग्वाही ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री खासदार संगमलालजी गुप्ता यांनी ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश महिला संपर्क प्रमुख व युवक संपर्क प्रमुख यांची राज्यस्तरीय बैठकीत पनवेल येथे केले.

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉलमध्ये बुधवारी (दि. २९) भाजपच्या ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश महिला संपर्क प्रमुख व युवक संपर्क प्रमुख यांची राज्यस्तरीय बैठक घेण्यात आली. या वेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष खासदार हंसराज भैय्या अहिर, प्रदेश अध्यक्ष योगेश टिळेकर, उपाध्यक्ष आमदार डॉ. संजय कुटे, लोकनेते रामशेठ ठाकूर, प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुजबळ, हरिश्चंद्र भोईर, (पान २ वर..)

## निवडक

### कोरोनावरील स्वदेशी एमआरएनए लसीला मंजुरी

**पुणे** : भारताचे औषध महानियंत्रकाने १८ वर्षांपेक्षा अधिक वर्षांच्या नागरिकांसाठी पुणे येथील जेननोव्हा बायोफार्मास्युटिकल्सच्या एमआरएनए कोविड लसीला मंजुरी दिली आहे. या व्यतिरिक्त डिसीजीआयने सीरम इन्स्टिट्यूटच्या कोव्होवॅक्सला काही अटींसह ७ ते १२ वयोगटातील मुलांसाठी आपत्कालीन उपयोगाकरिता मंजुरी दिली. विषयतज्ज्ञ समितीने बैठकीत एमआरएनए लसीसाठी शिफारस केली होती.

### उदयपूर प्रकरणाचा तपास आता केंद्रीय यंत्रणांकडे

**राजस्थान** : उदयपूरमध्ये दोन लोकांनी कन्हैयालाल या युवकाची हत्या केल्याच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकारणाचा तपास केंद्रीय गृहमंत्रालयाने एनआयए करण्याचा निर्णय बुधवारी (दि. २९) घेतला. इस्लामिक संघटनेचा संबंध आहे का, याचा तपास केंद्रीय पथक तपास करणार आहे.

## जळगाव येथे भीषण अपघात; पाच ठार, सहा गंभीर जखमी

जळगाव : प्रतिनिधी

भरधाव ट्रकने दोन वाहनांना जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात पाच जण जागीच ठार झाले. हा अपघात नशिराबाद टोलनाक्याजवळ बुधवारी (दि. २९) पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास घडला. ट्रक चालकाला डुलकी लागल्याने त्याचे ट्रकवरील ताबा सुटला आणि दोन वाहनांना धडक दिली. या अपघातात सहा जण जखमी झाले असून त्यांच्यावर डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत.



फैजपूर येथे बुधवारी जनावरांचा बाजार भरतो. येथे जळगाव येथून बकऱ्या घेऊन दोन बोलेरो पीकअप वाहने भुसावळच्या दिशेने जात असताना समोरुन येणाऱ्या भरधाव ट्रकने दोन्ही वाहनांना धडक दिली. अपघातानंतर ट्रक उड्डाणपुलावरील पिलरला धडकला. या अपघातात दोन्ही पिकअप वाहनांचा चक्काचूर झाला, तर बोलेरो वाहनातील प्रवासी पुलाखाली फेकले गेल्याने गंभीर जखमी झाले. यात चौघे जागीच ठार झाले तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# शेकापकडून केवळ श्रेय लाटण्याचे काम

## भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची टीका

### खांदा कॉलनी परिसरात गार्डनचे सुशोभिकरण



पनवेल : रामप्रहर वृत्त

आयत्या पिठावर रांगोळ्या काढण्याचा केविलवाना प्रयत्न काम शेतकरी कागार पक्ष करीत असल्याची टीका भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी विकास कामाच्या भूमिपूजनावेळी केली. प्रभाग क्रमांक ९, सेक्टर ५ आसूडगाव येथील गार्डनचे सुशोभिकरण महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या कामासाठी सभागृह नेते परेश ठाकूर आणि नगरसेविका चंद्रकला शेळके यांनी पाठपुरावा केला असून या कामाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. २९) भूमिपूजन झाले.

पनवेल महापालिका क्षेत्रातील खांदा कॉलनी परिसरात उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक एकनाथ गायकवाड यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक विकासकामे सुरू आहेत. त्या अंतर्गत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व सभागृह नेते परेश ठाकूर आणि नगरसेविका चंद्रकला शेळके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रभाग क्रमांक ९ सेक्टर ५ मधील आसूडगावातील गार्डनच्या सुशोभिकरणाचे काम मंजूर झाले आहे. या कामासाठी ९५ लाखांचा निधी वापरून गार्डनमध्ये विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या विकासकामांच्या भूमिपूजना वेळी उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, प्रविण पाटील, नगरसेविका चंद्रकला शेळके, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, (पान २ वर..)

# पनवेलच्या वडाळे तलावातील पाण्यावर होणार नैसर्गिक पद्धतीने प्रक्रिया



*कळंबोली येथील ७२ बेडचे कोविड समर्पित रुग्णालय पुन्हा कार्यान्वित करण्याकरीता मनुष्यबळ पुरवठा होण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदेमधील न्यूनतम स्तरावरील ठेकेदारास ठेका देण्याच्या विषयास स्थायी समितीच्या सभेमध्ये मंजुरी देण्यात आली.*

पनवेल : प्रतिनिधी

पनवेलमधील वडाळे तलावातील पाण्याचा दर्जा चांगला राहावा म्हणून नैसर्गिक पद्धतीने प्रक्रिया करण्यात येणार आहे. पटेल मोहल्ला परिसरातील जुन्या भूमिगत मलनि:स्सारण वाहिन्या ठिकाणी नवीन वाहिन्या टाकणे व इतर कामे करण्याच्या विषयांस स्थायी समितीच्या सभेत मंजुरी देण्यात आली.

महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा बुधवारी (दि. २९) मुख्यालयातील सभागृहात स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी सभागृहनेते परेश ठाकूर, जगदीश गायकवाड, प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, निलेश बावीस्कर, नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, सहायय्क आयुक्त वैभव विधाते, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सचिव तिलकराज खापर्डे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल मनपाच्या मालकीच्या वडाळे तलावातील पाण्याचा दर्जा चांगला रहावा म्हणून नैसर्गिक पद्धतीने प्रक्रिया करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली. मनपाहद्दीत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ अंतर्गत हरित क्षेत्र विकसित केलेल्या, वृक्षलागवड व लॉन या झालेल्या कामांची निगा, दुरुस्ती, देखभाल करणे, कळंबोली नोडमधील बाजारातील दैनिक शुल्क वसूल करण्यासाठी ई-निविदेतील उच्चतम स्तरावरील निविदाकारांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

घनकचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी तीन टन क्षमतेच्या १० घंटागाड्या, १४ घनमीटर क्षमतेच्या ११ घंटागाड्या, एक टन क्षमतेच्या ३२ घंटागाड्या खरेदी करण्यासाठी न्यूनतम दराच्या निविदेस मान्यता देणेबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

# भाजप सांस्कृतिक सेलच्या नियुक्त्या जाहीर




पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल शहराच्या भाजप सांस्कृतिक सेलच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या बुधवारी (दि. २९) सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन करण्यात आल्या.

रुद्रतेज शेटे, कौस्तुभ पाटील, कौस्तुभ सोमण, श्रेयस वाणी, सिद्धार्थ जोशी, शुभम साळवी, भूषण पाटील, साहिल शिंदे, साक्षी म्हात्रे, छायल भारंबे, प्रांजल आढाव, विजय नालंकर, ऋषिकेश जैतपाल, निलेश गायकवाड, रोहित पाटील, हर्षद शिंदे, रितूपर्णा किर्तोनिया यांची नियुक्ती करण्यात आली.

या वेळी ज्येष्ठ नगरसेवक अनिल भगत, नगरसेवक नितीन पाटील, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन व शहर अध्यक्ष निखिल गोरे उपस्थित होते.

## निवडक

### खारघरमधून वृद्ध व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** खारघर वसाहतीमधून एक वृद्ध व्यक्ती बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. राजकुमार लक्ष्मण चापेकर (वय ६२, रा. सेक्टर १२, खारघर) रंग गोरा, उंची पाच फूट चार इंच, अंगाने मजबूत, डोक्याचे केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, मिशी काळी असून अंगात पांढरा शर्ट व काळी पॅन्ट व काळे शूज घातलेली आहेत. त्यांना मराठी हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक विशाल बोरसे यांच्याशी संपर्क साधावा.

### वलप गावातून दुचाकीची चोरी

**पनवेल :** एका मोटरसायकलची चोरी झाल्याची घटना वलप गावाच्या हद्दीत घडली आहे. सोपान खाडेकर यांनी त्यांची १० हजार रुपये किमतीची हिरो मॅस्टो डिलक्स सफेद व लाल रंगाची मोटरसायकल स्कुटी राहत्या घरासमोर उभी करून ठेवली होती. अज्ञात चोरट्याने ही गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वावंजे येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक विवाहिता महिला कुठे तरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. काजल दिगंबर कांबळे (वय २६, रा. ए. के. गार्डन, वावंजे) उंची पाच फूट चार इंच, वर्ण गोरा, केस काळे, चेहरा गोलाकार, बांधा मध्यम, समोरील दात पडलेला असून अंगात गुलाबी साडी घातलेली आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाण्यात किंवा पोलीस हवालदार धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा.

### उरणमध्ये महिला सक्षमीकरण कार्यक्रम

**उरण :** कृषी संजीवनी सप्ताह अंतर्गत उरण तालुका कृषी विभागामार्फत महिला सक्षमीकरण हा कार्यक्रम मोठीजुई येथे घेण्यात आला. महिलांना सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना व भात पीक रोपवाटिका, तसेच परसबाग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कृषी सहायक अधिकारी एस. एस. ढाकणे, कृषी सहायक अधिकारी कोप्रोली सूरज घरत यांनी मार्गदर्शन केले. या वेळी महिला शेतकरी, महिला बचतगट प्रतिनिधी करुणा भोईर, कमल पाटील यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांना ‘रामप्रहर’ने फोडली वाचा

# एसटी स्मार्ट कार्ड काढण्यासाठी मुदतवाढ

**पनवेल : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांना एसटीमध्ये सवलतीसाठी स्मार्ट कार्ड काढण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात येत असल्याचे परिपत्रक महामंडळाने काढले आहे. याबाबत ‘रामप्रहर’मध्ये वृत्त प्रसिध्द करण्यात आले होते. आता ज्येष्ठ नागरिकांना एकादशीला पंढरपूरला जाण्यासाठी अडचण येणार नसल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

एसटी ही राज्यातील खेड्यापाड्यातील जनतेचे प्रवासाचे साधन आहे. एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिकांना एसटीमध्ये सवलतीसाठी स्मार्ट कार्ड ३० जून पूर्वी काढणे सक्तीचे केले होते. त्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी एसटी आगारात गर्दी केली होती. या कार्डसाठी देशात युनिक आयडी असलेले आधारकार्ड सोबतच पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स व निवडणूक ओळखपत्र यापैकी एक सक्तीचे केले आहे. एसटीत सवलत घेताना या पैकी कोणतेही एक ओळखपत्र चालत असल्याने स्मार्ट कार्डसाठी खेड्यापाड्यातून अनेक जण आधारकार्ड घेऊन येतात. त्यावेळी त्यांना वरील तीन पैकी आणखी एक ओळखपत्र आणि ओटीपी मागितला जातो. याशिवाय कार्ड मिळण्यास दोन ते अडीच महीने लागत असल्याने एकादशीला पंढरपूरला जाण्यासाठी आणि गणेशोत्सवाला कोकणात जाताना एसटीमध्ये सवलत मिळणे शक्य होणार नसल्याने अनेक ज्येष्ठ नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती त्याची


सोमवार, २७ जून २०२२ राम प्रहर 3
ज्येष्ठ नागरिकांची परवड
एसटी प्रवासातील सवलत मिळणे अवघड

दखल घेऊन महामंडळाचे वाहतूक विभागाचे महाव्यवस्थापक सुहास जाधव यांनी परिपत्रक काढून मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे.

या स्मार्ट कार्डसाठी देशात युनिक आयडी असलेले आधारकार्ड सोबतच पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स व निवडणूक ओळखपत्र यापैकी एक व ओटीपी सक्तीचे केले आहे. याबाबत विचारले असता फक्त आधारकार्ड आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. पण संगणकावरील प्रणाली ते मान्य करीत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असता त्याबाबत चौकशी करून योग्य ती दुरूस्ती करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

> **स्मार्ट कार्ड काढण्यासाठी अडचणी येत असल्याच्या तक्रारी आल्याने त्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. वयाच्या पुरव्यासाठी फक्त आधारकार्ड आवश्यक आहे. ते नसल्यास इतर पुरावे म्हणून पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स व निवडणूक ओळखपत्र आवश्यक आहे. पण संगणक प्रणाली मध्ये त्याबाबत अडचण येत असल्यास त्याची चौकशी करून दुरूस्ती करण्यात येईल.**
>
> **–सुहास जाधव, महाव्यवस्थापक, वाहतूक विभाग**

> **स्मार्ट कार्ड काढण्याची मुदत वाढवल्याबद्दल धन्यवाद. आधारकार्डसोबत इतर पुरावे म्हणून पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स व निवडणूक ओळखपत्र या पैकी एक व ओटीपी आवश्यक केले आहे. खेड्यातील सर्वच गरिबांकडे मोबाइल नसतो त्यांनी आधारकार्डसाठी दुसऱ्या कोणाचा तरी नंबर दिलेला असतो. त्यामुळे ओटीपी बाबत ही सक्ती करू नये.**
>
> **–निलाक्षी थळी, सामाजिक कार्यकर्त्या**

## पनवेल महापालिकेत अनुकंपा तत्वावर २३ आणि वारसा हक्काने ४० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या हस्ते नूकतेच अनुकंपा आणि वारसा हक्काने नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या वेळी स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेवक संतोष भोईर उपस्थित होते.

पनवेल नगर परिषदेचे पनवेल महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर आजपर्यंत अनुकंपा तत्त्वावर २३ आणि वारसा हक्काने ४० सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांनी दिलेल्या सूचनेनूसार आस्थापना विभागाचे उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या मार्गदर्शनाखाली आस्थापना विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी आजपर्यंतची ही सर्व प्रलंबित अनुकंपा तत्वावर आणि वारसा हक्काने नियुक्ती करण्याची प्रकरणे निकाली काढली आहेत.



## गव्हाण विभागात होणार मोफत वह्यावाटप कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली तीन दशके उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड २ यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विभागातील गरजू विद्यार्थ्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मोफत वह्या वाटप करण्यात येणार आहे.

गुरुवारी (दि. ३०) सकाळी १०.३० वाजता न्हावा राजिप शाळा, सकाळी ११.३० वाजता न्हावा खाडी राजिप शाळा, दुपारी ०२ वाजता शिवाजीनगर राजिप शाळा, दुपारी ०३ वाजता कोपर राजिप शाळा, सायंकाळी ०४ वाजता गव्हाण कन्या शाळा व गव्हाण राजिप शाळा, तर शुक्रवारी (दि. १ जुलै) दुपारी ०३ वाजता शेलघर राजिप शाळा, सायंकाळी ०४ वाजता बेलपाडा राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा प्रवक्ते वाय. टी. देशमुख, पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, कान्हाशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, न्हावे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाणच्या माजी सरपंच हेमलता भगत, उपसरपंच विजय घरत, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, वाहतूक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, उपाध्यक्ष अनंता ठाकूर, वसंतशेठ पाटील, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, महिला मोर्चाच्या उलवे नोड २ अध्यक्षा योगिता भगत, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## खारघर टेकडीवर अडकलेल्या दोन तरुणांची सुखरूप सुटका

**पनवेल : वार्ताहर**

खारघर टेकडीवर ट्रेकिंगसाठी गेलेल्या आणि अंधारात वाट विसरून तिथेच अडकेलल्या दोन तरुणांचा खारघर पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने सुखरूप सुटका केली आहे.

मानखुर्द येथील अभिषेक रामदास यादव (वय २२) आणि शंकर सुर्यनारायण गवळी (वय २२) दोघे जण खारघर टेकडीवर ट्रेकिंगसाठी आले होते. काही वेळेनंतर ते टेकडीवरून खाली उतरत असताना, पावसामुळे डोंगरावर मोठ्या प्रमाणात धुके पडल्यामुळे तसेच अंधार आणि झाडांमुळे त्यांना रस्ता शोधूनही सापडत नव्हता. त्यामुळे या तरुणांनी पोलीस कंट्रोलला संपर्क साधून घडलेल्या प्रसंगाची माहिती दिली. माहिती प्राप्त होताच खारघर पोलिसांनी अग्निशमन केंद्रातील जवानांसोबत खारघर डोंगर गाठून तरुणांचा शोध सुरू केला. यानंतर येथील जागांबाबत स्थानिकांशी संपर्क करून पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिक रहिवासी विजय पाटील तसेच आदिवासी पाड्यातील सागर पारधी, प्रकाश पारधी, समाधान नाईक आणि अरविंद ठाकूर यांना मदतीला घेतले आणि पुन्हा दोन तरुणांचे शोध कार्य सुरू केले. त्यावेळी रात्री एकच्या सुमारास शीळफाटा डोंगर झाडीतदोघेजण मिळून आले. तेथून या दोन तरुणांना घेऊन पोलीसपथकाने रात्री दोन वाजता खारघर पोलीस ठाणे गाठले. यानंतर तरुणाच्या कुटुंबीयांना संपर्क करुन पोलिसांनी ते सुखरूप असल्याची माहिती दिल्यानंतर त्यांना सोडून दिले.



## पनवेल तहसील कार्यालयाच्या इमारत बांधकामास मान्यता

**पनवेल : वार्ताहर**

अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्याच्या तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी शासनाने प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

पनवेल तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी ११ कोटी ३ लक्ष रुपयांच्या इमारत बांधकाम व अनुषंगिक कामांसाठी प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय नुकताच निर्गमित झाला. मुंबई व रायगड जिल्ह्याच्या मध्यस्थानी असलेल्या पनवेल तालुक्यातून यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग या माध्यमातून मोठ्या प्रमाणात दळणवळणाच्या सुविधा आहेत. पनवेल तालुक्यातील औद्योगिक विकास यामुळे येथे लोकवस्ती मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यातील महसूल इमारतीचे बांधकाम होणे आवश्यक बाब आहे.

**पनवेल : भाजप ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर यांना वाढदिवसानिमित्त सोशल मीडिया सेलचे शहर संयोजक प्रसाद हनुमंते, ओबीसी मोर्चा शहर सरचिटणीस प्रसाद म्हात्रे, सूर्यकांत पंडित, प्रदीप भगत, काशिनाथ भगत, ॲड. धनराज तोकडे, एस. के. भगत, संतोष म्हात्रे, प्रियंक माळी आदींनी शुभेच्छा दिल्या.**



## कोप्रोली येथील आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

श्री सिद्धिविनायक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल कोप्रोली व सुश्रुषा सुपर स्पेशालिटी पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने श्री सिद्धिविनायक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोप्रोली उरण येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये ब्लडप्रेशर टेस्ट ,शुगर टेस्ट, ईसीजी टेस्ट करण्यात आल्या. हा कॅम्प कोप्रोली गावचे मनोहर म्हात्रे व विकी म्हात्रे, सिद्धिविनायक हॉस्पिटल डॉक्टर कर्मचारी वर्ग, सुश्रुषा हॉस्पिटल पनवेल डॉक्टर व स्टाफ यांच्या सहकार्याने झाला. वय वर्षे ५० वर्षे असलेल्या अशा २५ ते ३० नागरिकांनी लाभ घेतला.

आरोग्य संबंधित १५ व्यक्तींची टूडी एको, टीएमटी सुश्रुषा हॉस्पिटलतर्फे मोफत करण्यात येईल. पेशंटला पिकप ड्रॉप हॉस्पिटलच्या ॲम्बुलन्सने आणि मोफत करण्यात येईल, अशी माहिती हॉस्पिटल जनसंपर्क अधिकारी कुमार लोंढे यांनी दिली.



## उरणच्या बाजारात रानभाज्या दाखल

**उरण : वार्ताहर**

वर्षातून एकदा तरी न रानभाज्या खाव्यात, अशी खेडेगावातील परंपरा आहे. त्यामुळे न ग्रामीण भागासह शहरी भागांतही त्यांना मागणी असते. या भाज्या एक ते दोन महिने फक्त जंगलात उगवतात. बांधावरील रानभाज्या गायब रानात मिळणाऱ्या भाज्या या पावसाळ्याच्या सुरुवातीच्या दिवसातील आहेत. पाऊस जसजसा वाढत जाईल, तसतसे विविध भाज्या रानात मिळतील.

बांधावरील रानभाज्या गायब झाल्या आहेत, त्यामुळे वणवण करावी लागते. पावसाळ्यात येणाऱ्या रानभाज्या स्वस्त, औषधी असूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. रानभाज्यांबद्दल नसलेली माहिती, करण्याच्या निराळ्या पद्धती, त्यामुळे या भाज्यांची विक्री अतिशय कमी होते. त्यामुळे स्वस्त असूनही या भाज्यांना सामान्यांच्या ताटात स्थान मिळत नाही. सर्वसामान्यांना पावसाळी भाज्यांचा पर्याय उपलब्ध होऊ लागला आहे.

सध्या बाजारात अळू विक्रीसाठी



आले आहेत, मात्र मागील वर्षी १० रुपयांना मिळणारा पाच अळूचा वाटा, या वर्षी २० रुपयांना मिळत आहे. टाकळा हा गुणाने उष्ण असल्याने शरीरातील वात व कफदोष कमी होण्यास मदत होते. वरचेवर ही भाजी खाल्ल्याने अंगातील अतिरिक्त मेद झडण्यास याचा उपयोग होतो. त्याचबरोबर त्वचाविकार कमी होतात. लहान मुलांच्या पोटातील कृमी बाहेर पडण्यासही या भाजीचा उपयोग होतो. उरण बाजारात आनंद नगर, उरण राजपाल नाका महाराष्ट्र स्वीट जवळ आदी ठिकाणी आदिवासी महिला भाजी विकतांना दिसत आहेत.

शेवळा ही औषधीयुक्त भाजी आहे. शेवळाची एक जुडी ३० ते ४० रुपयांपर्यंत विकली जाते. पावसाळ्यात या भाज्या अधिक मिळतात. अंबाडी, कुलू, भारंगी, टाकला आदी भाज्यांची जुडी १० रुपयास एक अश्या भावाने आम्ही विकतो, असे कातकरी यांनी सांगितले.

रानभाज्या या इतर भाजीपाल्याच्या तुलनेत स्वस्त असतात. त्या खायलाही पौष्टिक आणि फायदेशीर असतात. आदिवासी स्त्रिया रानावनात फिरून त्या मिळवितात. तसेच या भाज्या विकून त्यांना रोजगार मिळत असून, या रानभाज्या त्यांना आर्थिक उत्पन्नाचे ’साधन उपलब्ध करुन देत आहेत. अंबाडी आता दुर्मीळ होत असून, दिसेनाशी होत आहे. आंबट चवीची अंबाडीची भाजी ही चविष्ट तर असतेच, शिवाय अनेक पोषकतत्त्वांनीही परिपूर्ण असते. अंबाड्याच्या भाजीत आयर्न (लोह), व्हिटॅमिन–सी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी ६, कॅल्शियम, झिक आणि अँटीऑक्सिडंट यांसारखी अनेक पोषकतत्त्वे भरपूर प्रमाणात असतात.

## पनवेलच्या साहित्यिकांची पुस्तके शासनाच्या ग्रंथ निवड समितीच्या यादीत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाची ग्रंथ निवड समितीची २०१९ व २०ची यादी नुकतीच जाहीर झाली. या यादीमध्ये गजल पंढरी म्हणून ओळख असलेल्या पनवेलमधील पाच साहित्यिकांच्या सात पुस्तकांचा समावेश करण्यात आला आहे.

यामध्ये २०१९ च्या यादीत ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख यांनी संपादित केलेल्या ’गजलवेल’ या पनवेलमधील १५ गजलकारांच्या गजलांचा समावेश असलेल्या प्रातिनिधिक गजलसंग्रहाचा समावेश आहे. त्याचबरोबर कोमसाप पनवेल शाखेचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांच्या ’स्वप्नातले किनारे’, उपाध्यक्ष डॉ. अविनाश पाटील यांच्या ’माहौल’, दिवाकर वैशंपायन यांच्या ’अमृत मंथन’ या गजलसंग्रहांचा, तसेच कोमसाप पनवेल शाखेचे युवाशक्ती प्रमुख संदीप बोडके यांच्या ’उजळली सांजवेळ’ या कादंबरीचा समावेश आहे. २०२० च्या यादीमध्ये ए. के. शेख यांच्या ’गजलवेदना – एक आस्वादक समीक्षा’, तसेच ’कविता माझी सखी’ या पुस्तकांचा समावेश आहे. पनवेलमधील या साहित्यिकांच्या पुस्तक निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २५

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावीत (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**

***अ.*** टाटा एलक्सी — ***आ.*** हॅपीइस्ट माइंड
***इ.*** झेन्सर टेक्नोलॉजीस — ***ई.*** बीएएसएफ इंडिया

**२. लाईफ इन्शुरन्स ऑफ कार्पोरेशन (एलआयसी) चे मुख्यालय या शहरात आहे.**

***अ.*** दिल्ली — ***आ.*** कलकत्ता
***इ.*** मुंबई — ***ई.*** चेन्नई

**३. अदानी उद्योग समूहातील कोणत्या कंपनीची अलीकडे शेअर बाजारात नोंद झाली?**

***अ.*** अदानी इंटरप्रायझेस — ***आ.*** अदानी विल्मर
***इ.*** अदानी ग्रीन एनर्जी — ***ई.*** अदानी पॉवर

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**


## संपादकीय

# शेवटचा दे धक्का

महाराष्ट्रातील सत्तानाट्याचा कळसाध्याय आता सुरू झाला आहे. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रविष्ट झाले असून जोरदार युक्तिवाद दोन्ही बाजूंनी झालेले बुधवारी बघायला मिळाले. खरे सांगायचे तर महाविकास आघाडी सरकारचा कारभार केव्हाच आटोपला आहे. परंतु 'पोपट मेला आहे' हे कुणीतरी अधिकृतरित्या सांगावे लागते.

**अडीच वर्षांपूर्वी मागल्या दाराने येऊन महाराष्ट्राच्या बोकांडी बसलेले हे तीन पक्षांचे बिघाडी सरकार जनतेला कधीच आवडले नव्हते. कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससारखे पक्ष सत्तेवर यावेत असा जनादेशच नव्हता. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्या युतीला महाराष्ट्रातील मतदारांनी भरघोस मतांनी निवडून दिले होते. परंतु निवडणूक निकालांनंतर मित्रपक्षाची बुद्धी फिरताना भाजपच्या नेत्यांना बघावे लागले. गेल्या अडीच वर्षांत महाविकास आघाडी सरकारची इतकी प्रकरणे आणि भानगडी चव्हाट्यावर आल्या की कुठून हे सरकार अस्तित्वात आले असे सामान्य जनतेला वाटू लागले. जनादेशाविरुद्ध आलेल्या या सरकारला विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी सळो की पळो करून सोडले. या सरकारमध्ये राहून तोरा मिरवत फिरणारे दोन ज्येष्ठ मंत्री आज तुरुंगात आहेत एवढे सांगितले तरी पुरे. महाविकास आघाडीचे सरकार स्वत:च्या बोज्यानेच कोसळेल असे पहिल्यापासून म्हटले जात होते. परंतु संसदीय लोकशाहीमध्ये संख्याबळाला अनन्यसाधारण महत्त्व असते. या संख्याबळाच्या कवचकुंडलांच्या जोरावर विरोधीपक्षाचे जहरी बाण परतवत या सरकारने अडीच वर्षे तग धरला. परंतु दहा दिवसांपूर्वी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांनी आपल्या पक्षाचे ३९ आणि १२ अपक्ष व इतर अशा सुमारे ५० आमदारांनिशी महाविकास आघाडी सरकारला सोडचिठ्ठी देत आसाममधील गुवाहाटी गाठले. हा घाव मात्र महाविकास आघाडीच्या वर्मी लागला. कारण संख्याबळाची कवचकुंडलेच निघून गेली होती. विधिमंडळातील बहुमत चाचणीचा फैसला काय होईल हे सांगण्यासाठी कुण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. गेले दहा दिवस हे सत्तानाट्य सुरू असताना भाजपचे नेते मात्र चुपचाप बसले होते. पडद्यामागे राहून त्यांचे काही ज्येष्ठ नेते सूत्रे हलवत असल्याच्या बातम्या येत होत्या. परंतु हा वाद शिवसेनेचा पक्षांतर्गत प्रश्न आहे एवढेच उत्तर भाजपच्या गोटातून दिले जात होते. सर्वोच्च न्यायालयाने शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर आमदारांना अपात्रतेच्या प्रकरणी दिलासा दिल्यानंतर महाविकास आघाडी सरकार पडणार हे स्पष्ट झाले. अल्पमतातील सरकारला जनतेचे प्रश्न सोडवण्याचा अधिकार लोकशाहीने कधीही दिलेला नाही. सरकार अल्पमतात गेल्याचे ध्यानात आल्यानंतर भाजपच्या नेत्यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या आणि माननीय राज्यपालांकडे बहुमत चाचणीची मागणी केली. भाजपच्या नेत्यांवर गेल्या दहा दिवसांत भरपूर तोंडसुख घेतले गेले. या सत्तानाट्याच्या पाठीमागे भाजपचाच हात असल्याचा आरोप वारंवार होत होता. परंतु या संपूर्ण प्रकरणात भाजपच्या नेत्यांनी जी राजकीय प्रगल्भता आणि चातुर्य दाखवले त्याचे कौतुकच केले पाहिजे. शिवसेनेतील बंडाळी अंतिमत: आपल्यालाच लाभदायक ठरणार आहे हे ओळखूनही भाजपच्या नेत्यांनी आपला संयम सोडला नाही. तथापि महाविकास आघाडीचे सरकार अल्पमतात आल्याचे अधिकृतरित्या स्पष्ट होताच त्यांनी वेगाने हालचाली केल्या. खरे सांगायचे तर महाविकास आघाडीचे सरकार इतके कड्याच्या टोकावर येऊन पोचले आहे की एक छोटासा झटकादेखील कडेलोटासाठी पुरेसा आहे. शेवटचा दे धक्का हा निव्वळ उपचार उरला आहे.**

# ...अन्यथा देवळे धरणामुळे घात झाला असता!



खबरबात

शैलेश पालकर

पोलादपूर तालुक्यातील देवळे धरण पूर्ण होऊनही अद्याप पाणी साठवून ठेवण्यात यश आलेले नाही. राज्याच्या ग्रामविकास आणि जलसंधारण लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ ठाणे यांनी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग माणगाव जि.रायगडच्या माध्यमातून सन २००८-२००९ दरम्यान तयार केलेल्या टिपणी अहवालानुसार पोलादपूर तालुक्यातील विविध धरणांबाबत देवळे लघुपाटबंधारे योजना, लोहारे लघुपाटबंधारे योजना, तुर्भे खोंडा लघुपाटबंधारे योजना, किनेश्वरवाडी लघुपाटबंधारे योजना, चांभारगणी महाळुंगे लघुपाटबंधारे योजना, कोतवाल लघुपाटबंधारे योजना, कोंढवी साठवण तलाव आणि बोरघर लघुपाटबंधारे योजना सुरू होण्यासंदर्भात अहवाल तयार करण्यात आला होता. यापैकी देवळे लघुपाटबंधारे योजना अनेक वर्षांपासून रखडलेली असूनही त्या योजनेचा समावेश या लघुपाटबंधारे अहवालात करण्यात आला होता.

मातीबंधारा असलेल्या या बंधाऱ्याचे धरण मंजूर होऊनही प्रत्यक्षात काम सक्षमपणे करण्यात आले नसल्याने या धरणामुळे तिवरे धरणाची पुनरावृत्ती होऊ शकण्याच्या भितीने यापूर्वीच्या दोन तहसिलदारांनी पाहणी केली होती. गेल्या वर्षी २२ जुलै २०२१च्या रात्री देवळे धरणाने घात केला असता. चक्क या धरणाच्या वॉचमनने धरणाचा पाणीसाठा सोडल्याने धरण बचावले आणि अनेकांचा जीव जाणे टळले होते, अशी माहिती ग्रामस्थांनी प्रस्तुत प्रतिनिधीस दिली. या मुळे अर्धवट अवस्थेतील धरणप्रकल्प पूर्ण करण्यात शासनाने टाळाटाळ केली तर जलसिंचन किती होईल यापेक्षा किती जणांचे जीव जातील, हाच खरा प्रश्न निर्माण होत आहे.

देवळे लघुपाटबंधारे योजनेला मूळ प्रशासकीय मान्यता ३१ मार्च १९८१ रोजी केवळ ३२ लाख ६० हजार ४९६ रूपयांची असून एप्रिल १९९४ मध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडे ही योजना हस्तांतरीत झाली तेव्हा कामासाठी १ कोटी ६६ लाख ५२ हजार २९४ रूपये आणि अनुषंगिक खर्चापोटी ४२ लाख २ हजार ८९० रूपये अशी एकूण २ कोटी ८ लाख ५५ हजार १८४ रूपये अशी सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली. योजनेच्या दुसऱ्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये कामासाठी ४ कोटी ६८ लाख १ हजार ८७६ रूपये आणि अनुषंगिक खर्चापोटी ६८ लाख ९६ हजार ८५५ रूपये अशी एकूण ५ कोटी ३६ लाख ९८ हजार ७३१ रूपये अशी मंजूरी ३१ मार्च २००५ रोजी मिळाली. देवळे लघुपाटबंधारे योजनेचे काम ब-१ निविदांवर तीन टप्प्यांत पुणे येथील कंपन्यांना देण्यात आले. या कामाची सुरूवात मार्च १९९७मध्ये झाली. मात्र बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम न मिळाल्याने तसेच भूसंपादनात जमिनीचा दर कमी लावल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १९९८मध्ये योजनेचे काम बंद होते. यानंतर एस.पी.रेड्डी यांना विभागीय कार्यालयामार्फत पत्र देऊन सबलेटिंग करण्यास मंजूरी दिली. साधारणत: २००१ मध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला अदा केल्यानंतर मे २००३मध्ये योजनेचे घळभरणीचे काम पूर्ण करून पाणीसाठा करण्यास सुरूवात केली.

देवळे लघुपाटबंधारे धरण प्रकल्प योजनेच्या दुसऱ्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये कामासाठी ४ कोटी ६८ लाख १ हजार ८७६ रूपये आणि अनुषंगिक खर्चापोटी ६८ लाख ९६ हजार ८५५ रूपये अशी एकूण ५ कोटी ३६ लाख ९८ हजार ७३१ रूपये अशी मंजूरी ३१ मार्च २००५ रोजी मिळाली. या कामाची सुरूवात मार्च १९९७ मध्ये झाली. मात्र बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम न मिळाल्याने तसेच भूसंपादनात जमिनीचा दर कमी लावल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १९९८ मध्ये योजनेचे काम बंद केले होते. २००१मध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना काही प्रमाणात भूसंपादनाचा मोबदला अदा केल्यानंतर मे २००३मध्ये योजनेचे घळभरणीचे काम पूर्ण करून पाणीसाठा करण्यास सुरूवात केली. मात्र, हे काम पूर्ण झाल्यानंतर देवळे लघुपाटबंधारे योजनेच्या या धरणात पाणीसाठा होत असल्याची चाचणी घेतल्या-घेतल्याच धरणाची गळती सुरू झाल्याची माहिती माजी सरपंच तुकाराम केसरकर यांनी दिली आहे.



## धरणाच्या दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष

पोलादपूर तालुक्यातील आगामी धरणप्रकल्पांना मारक ठरलेला देवळे लघुपाटबंधारे योजनेचा धरण प्रकल्प आतापर्यंत कोट्यवधी रूपये खर्च होऊनही प्रत्यक्षात कोरडा असताना या योजनेच्या दुरूस्तीसाठी १ कोटी ३३ लक्ष रूपयांचे अंदाजपत्रक २००९मध्ये मुख्यअभियंता स्थानिकस्तर प्रदेश, पुणे यांच्याकडे २००९मध्ये पाठविण्यात आले असून अंदाजपत्रकाची शेरेपूर्तता होऊन अंदाजपत्रकास मंजुरी मिळताच धरणाच्या दुरूस्तीचे काम करण्याचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे स्थानिकस्तर मंडळ ठाणे यांनी सादर केल्याची माहिती ग्रामविकास आणि जलसंधारण लघुपाटबंधारे स्थानिकस्तर मंडळ ठाणे यांनी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग माणगांव जि.रायगडच्या माध्यमातून सन २००८-२००९ दरम्यान तयार केलेल्या टिपणी अहवालामध्ये नमूद आहे. पावसाळ्यात होणाऱ्या जलसिंचनामुळे या परिसरात नदीचे पाणी दूरवर असले तरी जमिनीला ओलावा असल्याने शेतीचा प्रयोग काही शेतकऱ्यांनी सुरूवातीची काही वर्षे केला होता. दरम्यान, धरणाच्या दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### आता इंटरनेटशिवायही ईमेलवर काम; फॉलो करा 'या' पाच स्टेप्स

आज आपण अशाच एका ट्रिकबद्दल जाणून घेणार आहोत ज्याद्वारे तुम्ही इंटरनेटशिवाय ईमेलवर काम करू शकाल. हे कसे करता येईल ते जाणून घेऊया. ॲप्स आणि इंटरनेटच्या या युगात, कोणतेही ॲप वापरण्यासाठी तुम्हाला तुमच्या मेल आयडीने लॉग इन करावे लागेल आणि त्यामुळे क्वचितच असे लोक असतील ज्यांचे ईमेल अकाउंट नसेल. बहुतांश लोक गुगलची मेलिंग सेवा जीमेल वापरतात. जीमेलवर मेल पाठवण्यासाठी आणि मेल मिळवण्यासाठी इंटरनेट आवश्यक आहे. आज आपण अशाच एका ट्रिकबद्दल जाणून घेणार आहोत ज्याद्वारे तुम्ही इंटरनेटशिवाय जीमेलवर मेल पाठवू शकाल. अनेक लोक जीमेल वापरतात परंतु इंटरनेटशिवायही तुम्ही मेल पाठवू आणि प्राप्त करू शकता हे फार कमी लोकांना माहीत असेल. आज आपण जीमेलच्या ऑफलाइन मोडबद्दल जाणून घेणार आहोत, जेणेकरून तुम्ही जीमेलवर इंटरनेटशिवाय आलेले मेल वाचू शकता, त्यांना उत्तर देऊ शकता आणि मेल शोधू शकाल. हे कसे करता येईल ते जाणून घेऊया.




फॉलो करा या पाच स्टेप्स : स्टेप १-जीमेल ऑफलाइन वापरण्यासाठी, प्रथम तुम्हाला तुमच्या कंप्युटरवर किंवा लॅपटॉपवर गुगल क्रोम डाउनलोड करावे लागेल. जीमेल ऑफलाइन फक्त क्रोम ब्राउझर विंडोमध्ये वापरला जाऊ शकतो, तुम्ही हे फिचर इनकॉग्निटो मोडमध्ये वापरू शकत नाही. स्टेप २-तुमच्या डेस्कटॉप किंवा लॅपटॉपवर क्रोम विंडो उघडल्यानंतर, तुम्हाला जीमेल ऑफलाइन सेटिंग्जवर जावे लागेल किंवा https://mail.google.com/mail/u/0/#setting/offline@#8217 या लिंकवर क्लिक करावे लागेल. स्टेप ३-तुम्ही या लिंकवर क्लिक करताच तुमच्यासमोर एक नवीन विंडो उघडेल. या विंडोमध्ये 'ऑफलाइन मेल एनेबल करा' असा पर्याय असेल. आता तुम्हाला या पर्यायावर क्लिक करावे लागेल. स्टेप ४-आता तुम्हाला तुमच्यानुसार सेटिंग्ज बदलावी लागतील किंवा कस्टमाइझ करावी लागेल. तुम्हाला किती दिवसांचे मेल सिंक करायचे आहेत ते तुम्ही येथे निवडू शकता जेणेकरून तुम्हाला त्या दिवसांचे मेल ऑफलाइन मोडमध्येही मिळू शकतील. स्टेप ५:आता तुम्हाला 'सेव्ह चेंजेस' हा पर्याय निवडून त्यावर क्लिक करायचे आहे.

# बाळकृष्ण कोल्हटकर नाट्यसृष्टीतील एक मानबिंदू

बाळकृष्ण हरि कोल्हटकर हे मराठीतील नाटककार, कवी, अभिनेते, दिग्दर्शक होते. त्यांनी लिहिलेल्या दुरितांचे तिमिर जावो, वाहतो ही दुर्वांची जुडी, मुंबईची माणसे, एखाद्याचे नशीब आदि नाटकांचे हजारांहून अधिक प्रयोग झाले आहेत. तीन दशकांच्या साहित्यिक कारकिर्दीत यांनी ३०हून अधिक नाटके लिहिली आहेत. बाळकृष्ण हरी कोल्हटकर ऊर्फ बाळ कोल्हटकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यांच्या कार्याचा घेतलेला हा छोटासा आढावा-



महाराष्ट्राचे लाडके नाटककार, उत्कृष्ट भावनाप्रधान भूमिका करणारे नट बाळकृष्ण हरी तथा बाळ कोल्हटकर म्हणजे नाट्यसृष्टीतला एक मानबिंदू होय आहे. बाळ कोल्हटकरांचा जन्म २५ सप्टेंबर रोजी सातारा येथे झाला. शिक्षण जेमतेम सातवीपर्यंतच झाले. लहानपणापासून त्यांना नाटकांची तसेच लेखनाचीही आवड होती. त्यामुळे लहानपणीच त्यांच्या लेखनाला सुरुवात झाली. वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी त्यांनी जोहार हे आपले पहिले नाटक लिहिले. १९४७पर्यंत त्यांनी रेल्वे खात्यात नोकरी केली. त्यानंतर लेखनासाठी आणि रंगभूमीसाठी त्यांनी आपले पुढील आयुष्य वाहून घेतले. त्यांनी लिहिलेली नाटके ही भावनाप्रधान आणि कौटुंबिक अशी आहेत. ज्यांनापुर्वी लोक हसायचे आणि टिंगल करायचे असे बाळ कोल्हटकर प्रेक्षकांची नस नेमकी ओळखत असत. त्यांच्या नाटकातील प्रसंग भले बेतलेले असोत थोडेसे अती भावनिक असोत पण सामान्य प्रेक्षकांना अश्रू पुसायला लावत. त्यांची बरीच नाटके अतिशय लोकप्रिय झाली. बऱ्याच नाटकांचे हजाराच्यांवर प्रयोग झाले आहेत.

व्यावसायिक रंगभूमीसाठी त्यांनी नाटके लिहिली होती, तरी प्रत्येक नाटकातून काही मूल्य जपली होती. दुरितांचे तिमिर जावो या नाटकांचे पंधराशे प्रयोग, वाहतो ही दुर्वाची जुडी या नाटकाचे चौदाशे प्रयोग, मुंबईची माणसे याचे जवळपास दोन हजाराच्यांवर तर एखाद्याचे नशीब या नाटकांचे हजारांवर प्रयोग झाल आहेत. यावरुन नाटककार म्हणून लोकांनी त्यांच्यावर किती प्रेम केले याची साक्षच पटते.

कोल्हटकर यांनी खेर विभागातील प्रसिद्ध हेरंब मंदिरात 'वाहतो ही दुर्वांची जुडी', 'वेगळं व्हायचंय मला', अशी काही प्रसिद्ध नाटके लिहिली तसेच सीमेवरुन परत जा, लहानपणा देगा देवा, देव दीनाघरी धावला, देणाऱ्याचे हात हजार, उघडले स्वर्गाचे दार, इत्यादी त्यांची गाजलेली नाटके. त्यांनी एकंदर ३० हून अधिक नाटके लिहिली आहेत. सर्वसामान्य प्रेक्षकांच्या आवडीची कल्पना असलेल्या कोल्हटकरांनी मध्यमवर्गीय कुटूंबातील प्रश्न हाताळणारी सुखांत नाटकेही लिहिली. प्रेक्षकांना जे हवे, जे आवडते ते त्यांनी रंगभूमीवर उभे केले. ते उभे करताना कथानकाची सुसूत्रतेनी बांधणी, काव्यात्मक संवाद आणि सुभाषितवजा टाळी घेणारी काही वाक्ये याचा त्यांनी प्रयत्नपूर्वक उपयोग करुन नाटके यशस्वी केली.

नाटककारांच्या बरोबरीने ते रंगभूमीचे उत्कृष्ट नटही होते. त्यांनी केलेल्या भूमिका अतिशय गाजल्या, त्या आजही लोकांच्या आठवणीत जशाच्या तशा आहेत. हेच एका नाटककाराचे आणि नटाचे मोठेपण आहे. अशा या ज्येष्ठ नाटककाराचे ३० जून १९९४ रोजी निधन झाले. अंबरनाथवासीयांचे कोल्हटकरांवर त्यांच्या कविता आणि नाटकांवर विशेष प्रेम याच प्रेमापोटी अंबरनाथमध्ये २००९-१० च्या दरम्यान बाळ कोल्हटकर ज्येष्ठ नागरिक कट्टा तयार करण्यात आला आहे.




**मुरुड : मुरुड सायगाव येथे चांगला पाऊस पडत असल्याने शेतीकामात महिला मग्न झाल्या आहेत.** (छाया: सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### जंकफूडमुळे कॅल्शिअम संपते; हाडे ठिसूळ होण्याचे प्रमाण वाढते

मॉडर्न लाइफस्टाइल जगण्याच्या नावाखाली जंकफूड खाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण सर्वत्र होत आहे. यामुळे आहारात पोषक तत्वांची कमतरता ,स्थूलता अशा अनेक कारणांमुळे लहान मुलांमध्ये कॅल्शियमची कमतरता जाणवू लागली आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या कॅल्शिअम गरजेकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.



विविध ठिकाणी किंवा हॉटेलमध्ये विकले जाणारे जंक फूड लहानमुलांपासून ते मोठयांपर्यंत अनेक जण आवडीने खाताना दिसून येतात. एखाद्या वेळेस जंकफूडसारखे पदार्थ खाणे ठिक आहे, परंतु बरीचशी लहानमुले इतर काही खातच नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. ते केवळ जंकफूडच मागतात. परंतु यामुळे लहान मुलांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. पालकांकडून याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

लहान मुलांमध्ये वाढत्या वयासोबत त्यांचा विकास होत असतो. शरीरात कॅल्शियमची कमतरता निर्माण झाल्यास हाडे ठिसूळ होतात, दात लवकर तुटणे असे परिणाम दिसून येतात. यासोबतच कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हात आणि पायाला मुंग्या येणे, अशक्तपणा जाणविणे अशा समस्या उद्भवतात. मात्र मुले पालकाकडे जंकफूड खाण्यासाठी आग्रह धरला जातो. जंकफूडचा अतिसेवनाने याचा विपरीत परिणाम शरीरावर दिसून येत आहे.

जंकफूडमध्ये फॅट, कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक असते, तर प्रोटीन, व्हिटॅमिनचे प्रमाण कमी असते.त्यामुळे त्यांच्या अतिसेवनामुळे कॅल्शियम, लोह कमी होण्याची शक्यता अधिक असते. सोबतच लठ्ठपणा व इतर समस्या, उच्चरक्तदाब, हार्ट संबंधित समस्या कमी वयातच जाणवू शकतात. त्यामुळे पोषक आहार, हिरव्या पालेभाज्याचा वापर आहारात करणे गरजेचे आहे. त्यामुळे शरीरात कॅल्शियमची पूर्तता होऊ शकते. दरम्यान, सध्या मुलांचा जंकफूड खाण्याकडे अधिक कल असतो. पालकांच्या बिझीशेड्युलमुळे या कडे काही प्रमाणात दुर्लक्ष होत आहे. मॉर्डर्न लाइफस्टाइल जगण्याचा हा एक भाग समजला जातो. मात्र कालांतराने त्याचे दुष्परिणाम दिसून येतात. त्यामुळे जंकफूड खाण्यापासून मुलांना शक्य तेवढे दूर ठेवले पाहिजे. यासाठी पालकांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

# वरंध घाटामध्ये दरड कोसळून एक जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड-भोर मार्गावरील वरंध घाटामध्ये वाघजाई मंदिराजवळ बुधवारी (दि. २९) सकाळी दरड कोसळली. या घटनेत एक जण जखमी झाला आहे. ही दरड लहान स्वरूपात असल्याने घाटातील वाहतूक सुरळीत सुरू आहे.

वरंध घाट पावसाळ्यामध्ये सातत्याने धोकादायक ठरत आहे. या घाटात वारंवार दरड कोसळून वाहतूक विस्कळीत होते. अनेकदा घाट बंदही ठेवण्यात येतो. मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमध्ये या घाटात ३०हून अधिक ठिकाणी दरडी कोसळल्या होत्या. गेल्या दोन दिवसांपासून महाडमध्ये पावसाला पुन्हा सुरुवात झाली आहे. बुधवारी सकाळी वरंध घाटातील वाघजाई मंदिराजवळ डोंगराचा काही भाग खाली आल्याने मंदिराजवळ खाद्यपदार्थ विकणारे अरुण पवार हे जखमी झाले. या घाटामध्ये महामार्ग विभागाकडून तैनात ठेवण्यात आलेल्या जेसिबीद्वारे ही दरड त्वरित हटवण्यात आली. त्यामुळे अरुण पवार यातून बचावले. त्यांना महाड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही दरड रस्त्याच्या एकाच बाजूला कोसळल्याने घाटातील वाहतूक सुरळीत सुरू असल्याचे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता अमोल महाडकर यांनी सांगितले.



(छाया : महेश शिंदे)

# रोह्यातील रस्त्याची दूरवस्था
## किमान खड्डे भरण्याची नागरिकांची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील सागर डेअरी ते एक्सल कॉलनीपर्यंतच्या रस्त्याची दूरवस्था झाली आहे. रस्त्यावरील खड्डे पावसाच्या पाण्याने भरले आहेत. त्यामुळे वाहने खड्ड्यात आदळत आहेत. त्याचा प्रवासी व वाहनचालकांना त्रास होत असून रोहा नगर परिषदेने किमान खड्डे तरी भरावेत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

रोहा नगर परिषद हद्दीतील सागर डेअरी ते रोहा न्यायालय, एक्सल कॉलनी हा रस्ता पुढे भुवनेश्वरकडे जाण्यासाठी उपयुक्त ठरतो, मात्र या महत्त्वाच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. पावसाळ्यापूर्वी हा रस्ता होणे अपेक्षित होते मात्र या रस्त्याचे काम झाले नाही. खड्डेही भरले गेले नाहीत. पाऊस सुरु झाल्याने हे खड्डे मोठे झाले असून या खड्ड्यांत पावसाचे पाणी साचत आहे. या पाण्यामुळे वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे वाहने खड्ड्यात आदळतात. दुसरीकडे वाहने जवळून गेल्यास खड्ड्यातील पाणी पादचाऱ्यांवर उडत आहे. शहरातील सागर डेअरी ते एक्सल कॉलनी या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता आहे. हे खड्डे भरणे आवश्यक आहे.


(छाया : महादेव सरसंबे)

# कर्जत स्थानकात आणखी एक रेल्वेमार्ग, जुना पादचारी पूल होणार निकामी


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या कर्जत स्थानकात नवीन लोहमार्ग टाकण्यात येत आहे. त्यासाठी भिसेगाव-गुंडगे भागात जाणारा रेल्वेचा पादचारी पूल निकामी करण्यात येणार आहे. दरम्यान, नवीन रेल्वेमार्गामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी मध्य रेल्वेकडून नवीन पादचारी पूल उभारला जात असून त्या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

पुण्याकडे जाणाऱ्या सर्व गाड्या अतिरिक्त इंजिन लावण्यासाठी कर्जत रेल्वे स्थानकात थांबत असतात. त्यामुळे कर्जत रेल्वे स्थानकाला विशेष महत्त्व आहे. या स्थानकात ये-जा करणाऱ्या गाड्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यात पनवेल-कर्जत मार्गावरून दक्षिणेकडे जाणाऱ्या गाड्यांची संख्याही वाढली आहे. त्याचवेळी पनवेल रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण करण्यात येत आहे.



त्यामुळे कर्जत स्थानकात फलाट तीनच्या बाजूला नवीन रेल्वे मार्ग टाकण्यासाठी जागा निर्माण करण्यात येत आहे. हे गेल्या काही महिन्यांपासून सुरु आहे. या कामाआड येणारा व भिसेगाव-गुंडगे भागात जाणाऱ्या जुन्या पादचारी पुलाचा भाग तोडावा लागणार आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होणार आहे, ही अडचण लक्षात घेऊन मध्य रेल्वेने कर्जत स्थानकात पुणे बाजूकडे असलेल्या पादचारी पुलाला आणखी एक जोड पूल उभारला आहे. त्या पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून हा पूल थेट कर्जत स्थानकाच्या बाहेर उतरणार आहे.

## भागूचीवाडी शाळेत राजर्षी शाहू महाराज जयंती

**कर्जत : बातमीदार**

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नालासोपारा येथील सामाजिक बांधीलकी संस्थेने भागूचीवाडी येथील प्राथमिक शाळेतील ६५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या वेळी विद्यार्थ्यांना खाऊचेही वाटप करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कामेरकर, शेखर पेणकर, सुनील इंदप, वंदना खाडे, डायना लोबो, ओमकार ढेखले, मुकुंद आचारेकर, संतोष खेड़ेकर, अनिल मोरे, शाळेचे मुख्याध्यापक हरिचंद्र आढारी यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# आवास येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

क्षात्रैक्य समाजाच्या वतीने आवास येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन चौल पाचकळशी समाज अध्यक्ष सुरेश घरत (कोटकर) यांनी केले.

आवास येथे ६ ते ९ जानेवारी २०२३ मध्ये राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि. २७) सायंकाळी चौल येथील पाठारे क्षत्रिय समाज सभागृहात पंचक्रोशीतील शेतकरी व बागायतदारांची बैठक घेण्यात आली. त्यावेळी सुरेश घरत (कोटकर) बोलत होते.

आवास येथे आयजीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवात विविध प्रकरचे शेतीमालाचे प्रदर्शन व विक्री त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर, चर्चासत्र, परिसंवादाचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच विविध स्टॉल, बचतगटाच्या माध्यमातून अन्न पदार्थ, तसेच अन्य उत्पादने विक्रीची संधी मिळणार आहे. या कृषी महोत्सवाच्या निमित्ताने कबड्डी, कुस्ती, शरिरसौष्ठव आणि बैलगाडी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती क्षात्रैक्य समाज सचिव प्रदिप नाईक यांनी या वेळी दिली.

क्षात्रैक्य समाजाचे अध्यक्ष अविनाश राऊळ, सचिव प्रदिप नाईक, आगरी समाज नेते अनंत गोंधळी, भंडारी समाजाचे भास्कर चव्हाण, अशोक अंबूकर, सदानंद पडते, श्रीनाथ कवळे, मनोज राऊळ, रवींद्र वर्तक, अनंत घरत, नरेश म्हात्रे, सदानंद ठाकूर, आर. डी. नाईक, उदय नाईक, सुनिल नाईक, संतोष घरत, दिलीप राऊत आदींसह पाचकळशी समाज बांधव उपस्थित होते. अतुल वर्तक यांनी आभार मानले.


(छाया : महेंद्र खैरे)

# जिजाऊ फाउंडेशनकडून नांगुर्ले येथे वृक्षारोपण

**कर्जत : बातमीदार**

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजमाता जिजाऊ फाउंडेशनच्या वतीने कर्जत तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायत हद्दीमधील नांगुर्ले गावाच्या ओसाड टेकडीवर वृक्षारोपण करण्यात आले.

संघटनेचे कार्यकर्ते आणि आदिवासी महिलांनी या उपक्रमात भाग घेत असंख्य रोपांची लागवड केली. फाउंडेशन अध्यक्ष पूजा सुर्वे, सुवर्णा सुर्वे, गणेश पारठे, तेजस मोरे, राजेंद्र देशमुख, वर्षा पवार, योगिता हुमने, पल्लवी कनोजे, मनिषा पवार, कांचन देशमुख, लक्ष्मी लांगी यांच्यासह नांगुर्ले ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.




### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्रीमती कुसूम तुळशिराम पाटील, श्रीमती भावना भाऊ पाटील, श्री. योगेश भाऊ पाटील, श्री. रमेश काळूराम पाटील, श्री. लखन भाऊ पाटील, श्री. साजन भाऊ पाटील, श्री. हरिश्चंद्र काळूराम पाटील, श्री. मनोहर काळूराम पाटील यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करुन घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे-जांभुळपाडा, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३१/१४ | ०-१५-४०<br>पो.ख. ०-०३-९०<br>**एकूण ०-१९-३०** | ०.४६ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २९/०६/२०२२.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल दूरध्वनी क्र. : २७४५६३०६


## भिसेगाव येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

कर्जत शहरातील भिसेगाव येथील जयअंबे भवानी मंदिरात लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट संचालित आनंदो प्रकल्पाअंतर्गत सुमारे ४४५ गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वाटप कार्यक्रमाला नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, भिसेगावचे पोलीस पाटील संजय हजारे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सतीश श्रीखंडे आपत्ती व्यवस्थापन प्रभारी जितेंद्र ओसवाल, ॲड. प्रीती तिवारी, सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा मुंढे, कवी विशाल उशीरे, केंद्रप्रमुख सूर्यवंशी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे प्रकल्प व्यवस्थापक कांचन हजारे, सहाय्यक मोहिनी हजारे यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM RE –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O &M ) /DIVN/ MHD/Tech/Tender-32/ 2022-23 Dtd.30.06.2022 RFx No.7000023839** | **Sub:-** Invitation of SRM **RE-Tender** for the work of AMC for various regular preventative maintenance/ emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M DIV Mahad for the year 2022-23. | **Rs. up to 7,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
**Bid submission is from 30.06.2022 @ 00:00 hrs to 06.07.2022@23:59Hrs for above tender**
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer, EHV (O&M) Dn, Mahad**



क्र.रोनप/भांडार/जा.नि.सूचना प्रसिद्धी/५२९/२०२२
**रोहा नगर परिषद, रोहा, जि.रायगड.**
email : rohanagarpalika@gmail.com
दिनांक : २९/०६/२०२२

### फेर जाहिर निविदा सूचना (तृतिय प्रसिद्धी)

रोहा नगर परिषदेच्या विविध विभागास सन २०२२-२३ करिता विविध साहित्य व सेवा पुरवठा करणेकामी विहीत नमुन्यात वार्षिक दरपत्रके मागविणेत येत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| क्र. | तपशील | निविदा फॉर्म फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | नगर परिषदेस आवश्यकतेनुसार फोटोग्राफी व व्हिडिओ शुटींग सेवा पुरविणे. | ५००/- | ५०००/- |
| २. | नगर परिषदेस आवश्यकतेनुसार विद्युत साहित्याचा पुरवठा करणे. | ५००/- | ५०००/- |
| ३. | पाणीपुरवठा विभागास आवश्यकतेनुसार चेकनट व स्पिंडल दुरूस्ती करणे तसेच आवश्यकता भासलेस नवीन पुरवठा करणे. | २००/- | २०००/- |
| ४. | डोलवहाळ पंपहाऊस येथील रोहित्र (Transformers) ची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ५००/- | ५०००/- |

**अटी व शर्ती :-**
१) विहित नमुन्यातील निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे दिनांक ३०-०६-२०२२ ते दिनांक ०७-०७-२०२२ पर्यंत कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदा पत्रे/फॉर्म रक्कम रूपये वर उल्लेख केल्याप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरून निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करून घेता येतील.
२) निविदा फॉर्ममधील सर्व अटी व शर्ती निविदा सादर करताना बंधनकारक राहतील.
३) विहित पद्धतीने दर नमूद केलेली दरपत्रके नगर परिषद कार्यालयात नोंदणी शाखेत दिनांक ०७-०७-२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी रोहा नगर परिषद कार्यालय, रोहा येथे दाखल करता येतील. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०८-०७-२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडणेत येतील.
४) कोणतेही कारण नमूद करून अथवा असे कारण न देता आलेल्या निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**



**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

### जाहीर सूचना

कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब सं. व. सु. विभाग, महाड महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, महाड यांच्या कार्यालयातर्फे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, ता. माणगाव, जि. रायगड येथील १०० के.व्ही .कांदळगाव-म्हसळा सर्किट २ चे तारा ओढण्याचे काम पूर्ण झालेले असून १०० के.व्ही. कांदळगाव-म्हसळा सर्किट २ द्रिपथ वाहिनी कांदळगाव उपकेंद्र या मधून दि. ०१.०७.२०२२ व त्यानंतर कोणत्याही दिवशी विद्युत प्रवाह सुरु करण्यात येईल. ही वाहिनी कांदळगाव, निजामपुर, शिरसाड, वाकी, कोस्ते, खर्डी, नाणोरे, कळमजे, बामणोली, मांगरुळ, राजिवली, सुर्ले, मोर्बा, डोंगरोली, साई, रनावडे, चांदोरे, घोणसे, देवघर, देवघर कोंड, ढोरजे, पाभरे जि. रायगड या गावांच्या शिवारातून जाते. या वाहिनीच्या मनोऱ्यांवर चढण्याचा कोणीही प्रयत्न करू नये. त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका होवू शकतो. मनोऱ्यांना गुरे-ढोरे बांधू नयेत. तसेच वीजवाहिनी खालून शिडी, लोखंडी सळ्या वगैरे वस्तुंचे ने-आण करणे धोक्याचे आहे. सदर सूचनांचे उल्लंघन होवून अपघात घडल्यास त्याची कोणतीही जबाबदारी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीवर राहणार नाही, याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**श्री. पंकज तळेले**
**कार्यकारी अभियंता**
**अ.उ.दा.सं.व.सु. विभाग महाड**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-25/22-23 **7000023771** | AMC of preventive maintenance, Emergency and Breakdown of various 220KV and 100KV Lines under Panvel Division. | **Rs. 50 Lakhs** |
| Tend-26/22-23 **7000023786** | AMC of preventive maintenance, Emergency and Breakdown for the work of 400kV & 220kV EHV lines under 400kV R.S. (O&M) Division Nagothane. | **Rs. 40 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee :- Rs. 500/- + GST Submission of bids from 28.06.2022 to 05.07.2022 up to 11:00 hrs., Opening date :-** 05.07.2022 @ 13:00 Hrs.
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8356921558
E-mail ID **se7200@mahatransco.in**

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



## त्वरित पाहिजेत

**पनवेलमधील साड्यांच्या भव्य शोरुमसाठी अकाऊटंट व कॅशिअर पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा.**

संपर्कासाठी पत्ता

द्वारकादास शामकुमार, छ. शिवाजी चौक, पनवेल.
शरद पाटील :- ८१०४२०७७९३



**Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's**
## RAMSHETH THAKUR HIGHER SECONDARY VIDYALAYA
**(SELF FINANCING JUNIOR COLLEGE)**
Plot No. 1, Sector-33, Kharghar Tal: Panvel Dist Raigad. Navi Mumbai - 410210

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2022-2023**

Full time & Part time **Assistant Teachers** for the Academic Year 2022-2023, On Purely Temporary basis for the following subjects.

| Sr. No. | Subjects | Full Time / Part Time | Qualifications |
|---|---|---|---|
| 1 | Commerce | Full Time | M.Com B.Ed. |
| 2 | Hindi | Full Time | M.A. (Hindi) B.Ed. |
| 3 | Chemistry | Part Time | M.Sc.(Chemistry) B.Ed. |
| 4 | Physical Educator | Full Time | Post Graduation, MP.Ed. |
| 5 | Lab Assistants (Physics / Chemistry / Biology) | Full Time | B.Sc. / M.Sc. |

Applications with full details should reach to the **CHAIRMAN, J.B.S.P. Sanstha, Ramsheth Thakur Higher Secondary Vidyalaya, Plot No: 1, Sector - 33, Khaghar - 410210**
- Candidates may submit the application by email to **principalrthsv@gmail.com** on or before **Monday 11th of July 2022.**
- If required **Contact : Mrs. Nisha Nair - 9987476532 or Mr. Meshram - 9821057464**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

## निवडक

### कोकणात तुरळक पावसाची नोंद

**नवी मुंबई :** कोकण विभागात बुधवारी (दि. २९) सरासरी १८.० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद रायगड जिल्हयात २३.६मि.मी. झाली आहे. कोकण विभागात आत्तापर्यंत एकूण ३९५.८ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. ठाणे १०.१ मि.मी., पालघर १८.०मि.मी, रायगड २३.६मि.मी., रत्नागिरी १४.४ मि.मी., सिंधुदुर्ग २१.८ मि.मी. अशी जिल्हानिहाय पावसाची आकडेवारी आहे.

### आपटा कोळीवाड्यातील तलावाची स्वच्छता

**मोहोपाडा :** आधार सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून नेहमी छोट्या मोठ्या समाजोउपयोगी उपक्रम राबविले जातात. त्याचा एक भाग म्हणून रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा नवीन कोळीवाड्यातील तलाव हे गेल्या ३० वर्षांपासून केर कचरा दुर्गंधीयुक्त घाण व सापांचे वस्तीस्थान होते. त्यामुळे दरवर्षी रोगराईचे कारण होत असे म्हणून आधार सामाजिक बहुउद्देशीय संस्थेमार्फत तळावाचे साफसफाईचे काम करण्यात आले. तळ्यामधील गाळ जेसीबीच्या साहाय्याने बाहेर काढण्यात आला. यासाठी आपटा कोळीवाड्यातील ग्रामस्थांनी श्रमदान करून आधार सामाजिक संस्थेला मदतीचा हातभार लावला.

# देशातील सर्वसामान्य जनता भाजपसोबत

## भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांचे प्रतिपादन; पंतप्रधानांचे अभिनंदन

**नवी मुंबई : बातमीदार**

तब्बल २० वर्षांच्या न्यायालयीन संघर्षास संयमीपणे साजरे जाणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातील काँग्रेसच्या जकिया जाफरी यांची याचिका निकाली काढून सर्वोच्च न्यायालयाने पंतप्रधान मोदी यांच्या निर्दोषत्वावर शिक्कामोर्तब केल्याने भारतीय जनता पक्षाची मान अभिमानाने उंचावली आहे. ही मोदी यांच्यासाठी आणि भाजपसाठी सर्वोच्च समाधानाची बाब असून ताज्या पोटनिवडणूक निकालाने देशातील सर्वसामान्य जनतादेखील मोदी आणि भाजपसोबत असल्याचे सिद्ध झाले आहे, असे प्रतिपादन भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

देशाच्या न्यायव्यवस्थेवर भाजपचा पूर्ण विश्वास असल्यामुळेच २० वर्षे चाललेल्या या न्यायालयीन लढाईत भाजपने कोठेही शक्तिप्रदर्शन, आंदोलने किंवा टीकाटिपणी करून न्यायप्रक्रियेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला नाही, असा टोला त्यांनी विरोधी पक्षांना मारला. याउलट या प्रक्रियेस संयमाने सामोरे जाऊन पंतप्रधान मोदी यांनी न्यायव्यवस्थेच्या सार्वभौमत्वाविषयीचा आदर देशाच्या जनतेमध्ये रुजविला. पंतप्रधानांच्या या संयमी स्वभाव वैशिष्ट्यामुळेच आज संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी उभा असल्याचे चित्र असून लोकसभेच्या तीन व विधानसभेच्या सात जागांसाठी



झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपने प्रस्थापित पक्षांचे बुरुज उद्ध्वस्त करून पक्षाचा झेंडा रोवला आहे. जनता मोदी यांच्यासोबत असून 'सबका साथ सबका विकास' या पंतप्रधानांच्या ध्येयाच्या वाटचालीत जनतेने उत्स्फूर्त सहभाग घेतल्याचे सिद्ध झाले आहे, असे रामचंद्र घरत म्हणाले.

पोटनिवडणुकांतील या विजयाआधी पंतप्रधान मोदी यांच्या विरोधातील फेरविचार याचिका सर्वोच्च न्यायालयानेच निकाली काढल्यामुळे भाजपचा विजय अधिक तेजस्वी झाला आहे. सन २००२ मधील गुजरात दंगलप्रकरणी नरेंद्र मोदी यांच्यासह ६४ जणांना निर्दोष ठरविण्याच्या विशेष चौकशी पथकाच्या निर्णयास काँग्रेसच्या जकिया जाफरी यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. गुजरात उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तेथेही विशेष चौकशी पथकाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याने पंतप्रधानांविरोधातील राजकीय कारस्थानास चपराक बसली आहे, असे ते म्हणाले.

गेल्या २० वर्षांत विरोधकांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर बेलगाम आरोप करून त्यांची प्रतिमा उद्ध्वस्त करण्याचा एककलमी कार्यक्रम राबविला. या स्वार्थामुळे देशातील विधायक समाजकारणाकडे या पक्षांनी पाठ फिरविल्यामुळेच जनतेने त्यांना निवडणुकीत धडा शिकवून मोदी यांच्या विकासाच्या ध्येयास पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे, अशी टीकाही रामचंद्र घरत यांनी केली.

## प्रभागनिहाय प्रारुप मतदार याद्यांच्या हरकती व सूचनांसाठी ३ जुलैपर्यंत मुदतवाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२२ करीता ४१ प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आल्या असून यामध्ये नागरिकांच्या काही तकारी अथवा सूचना असल्यास त्या दाखल करण्याकरिता ३ जुलै २०२२ पर्यंतचा कालावधी जाहीर करण्यात आलेला आहे. राज्य निवडणूक आयोगाने बुधवारी (दि. २९) सुधारित कार्यक्रम जाहीर केलेला असून त्यानुसार प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीवरील हरकती व सूचना दाखल करण्याचा अखेरचा १ जुलै २०२२ ऐवजी ३ जुलै २०२२ असा सुधारित करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या व ३१ मे २०२२ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार संघाच्या याद्या नमुंमपा निवडणूकीसाठी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. या याद्यांनुसार एकूण मतदार संख्या ९०८४३३ इतकी असून त्यामधून ६२९०९ इतकी मतदार संख्या विविध कारणांनी वगळण्यात आलेली आहे. त्यानुसार ८४५५२४ इतकी एकूण मतदार संख्या असून त्यामध्ये ४६९५२४ इतकी पुरुष मतदार संख्या आणि ३७५९४४ इतकी स्त्री मतदार संख्या आणि इतर ५६ मतदार संख्या ग्राह्य धरण्यात आलेली आहे.

नागरिकांना तत्परतेने आपली हरकत नोंदविता यावी याकरिता मा. राज्य निवडणूक आयोगाने ट्रू – वोटर प्लिकेशन उपलब्ध करून दिले असून याव्दारेही मतदार घरबसल्या अत्यंत सहजपणे आपली मतदार यादी विषयीची हरकत अथवा सूचना नोंदवू शकतात. ९ जुलै २०२२ रोजी अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिध्द करण्यात येणार आहेत. या पत्रकार वार्तालाप प्रसंगी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या समवेत निवडणूक उप आयुक्त डॉ. अमरिश पटनिगेरे उपस्थित होते.

२ व ३ जुलै २०२२ रोजी शनिवार व रविवारची कार्यालयीन सुटी असली तरी आठही विभाग कार्यालय तसेच मुख्यालय निवडणूक विभाग याठिकाणी मतदारांना हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. त्याचप्रमाणे ट्रू वोटर पव्दारेही ऑनलाईन स्वरुपात हरकती व सूचना दाखल करता येतील.

## सुक्या मासळीला मागणी वाढली

### दरात २० टक्क्यांनी वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माशांचा प्रजनन काळ आणि समुद्र खवळलेला असल्याने जून, जुलै महिन्यात मासेमारी बंद असते. काही दिवसांपासून पावसाला सुरुवात झाली आहे. त्यात मासेमारी बंद असल्याने खवय्यांना बाजारात मासळी मिळत नाही. यासाठी त्यांनी सुक्या मासळींवर ताव मारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे त्यांची मागणी वाढली असून दरात सुद्धा २० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

पाऊस सुरू होताच अनेकांना तळलेले, मसालेदार गरम पदार्थ खायलाही आवडतात. परिणामी सुक्या मासळीची मागणी अधिक व आवक कमी असल्याने मागील महिन्याच्या तुलनेत या महिन्यात भाव तब्बल १५ ते २० टक्क्यांनी वाढले आहेत. गेल्या महिन्यात ३०० रुपये किलोने मिळणारी मोठी वाकडे आता तब्बल ५०० ते ६०० रुपयांना मिळत आहे. सुके बोंबील ५०० वरून ६०० ते ६५० रुपये किलोने विक्री होत आहेत. तसेच



साधी सोडे, उच्च दर्जाचे सोडे, अंबाडी सुकट, सुकट कोळी, वागटी मोठी, वाकटी छोटी या सगळ्यांचे भाव वाढलेले आहेत.

पावसाळ्यात मांसाहार खाणाऱ्यांना सुक्या मासळीचा उत्तम पर्याय व आधार असतो, मात्र मासळीची आवक कमी झाल्याने सुक्या मासळीचे भाव खूप वाढले आहेत. डिझेलचे व मजुरीच्या वाढलेल्या दरामुळे सुद्धा सुक्या मासळीचे भाव वाढले आहेत. मासळीची आवक कमी झाल्याने सुकवलेले सुरमई व पापलेट हे महागातले मासेही बाजारातून गायब झाले आहेत.

**समुद्रात अगदी कमी प्रमाणात मासळी सापडते. सापडलेली ताजी मासळी विकण्यावर मच्छीमारांचा कल असतो. मासळी आधीच कमी त्यात सुकवण्यासाठी कशी उरणार. त्यामुळे मासळी फार कमी जण सुकवत आहेत.**

**–गौरी पाटील, मासळी विक्रेत्या**

**पावसाळ्यात समुद्रातील मासळी मिळत नसल्याने सुकी मासळीचा उत्तम पर्याय असतो. त्यामुळे किंमत वाढली तरी काही प्रमाणात त्यांची खरेदी केली आहे.**

**–किरण पालव, मासळी खवय्ये**

## अमरनाथ यात्रेसाठी विरूपाक्ष मंदिरात प्रार्थना

**पनवेल : वार्ताहर**

दोन वर्षाच्या कोरोना महामारीत स्थगित असलेली श्री अमरनाथ यात्रा यंदा ३० जून २०२२ रोजी प्रारंभ होत असुन श्री अमरनाथ श्राईन बोर्ड व स्थानिक प्रशासन यात्रा सुरळीत व्हावी म्हणुन जय्यत तयारीत आहेत. श्री अमरनाथ सेवा मंडळ मंडळाच्या परंपरेनुसार पनवेलमधील प्रसिद्ध श्री विरूपाक्ष महादेव मंदिरात दर्शन घेऊन श्री अमरनाथ यात्रा व सर्व यात्रेकरूंच्या सफलतेची प्रार्थना करीत आशिर्वाद घेतला.

एकूण ३६ जण या पहिल्या जत्थ्यात सहभागी झाले आहेत. हर हर महादेवचा गजर करीत बालटाल ते पवित्र गुफां हा १४ कि. मी. चा खडतर प्रवास दऱ्याखोऱ्यातुन, बर्फाळ प्रदेशातुन होणार आहे.

लहरी हवामानाचा सामना करीत बाबा बर्फानीचे पवित्र दर्शन घेत मंडळ आपली २७ वर्षांची परंपरा पुर्ण करण्यास आपल्या सर्वांच्या सदिच्छा व आशिर्वाद द्यावेत असे आवाहन श्री अमरनाथ सेवा मंडळ, पनवेलचे संस्थापक अध्यक्ष सुनील अचोळकर यांनी केले आहे.




## झाडांच्या फांद्या पदपथावर; नागरिक संतप्त

### नवी मुंबईत वृक्षछाटणी धीम्या गतीने

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरात पावसाचे दमदार आगमन झाले तरी नवी मुंबई मनपा कडून मान्सूनपूर्व कामे सुरूच आहेत. नेरूळ विभागात वृक्षछाटणीची कामे सुरूच आहेत. झाडांच्या फांद्या त्वरित उचलण्याची कारवाई धीम्या गतीने होत असल्याने पदपथावर फांद्या जैसे थे असल्याने नागरिक संताप व्यक्त करित आहेत.

नवी मुंबई मनपाच्या माध्यमातून मान्सूनपूर्व कामाचा कालावधी संपला तरी कामे सुरूच आहेत. नेरूळविभागात झाडांच्या फांद्या छाटणीची कामे अद्यापही सुरूच आहे. झाडांची प्रमाणापेक्षा जास्त छाटणी केली जात असून वृक्ष छाटणीच्या नावाखाली खोड छाटली जात असल्याचा आरोप वृक्षप्रेमी आबा रनवरे यांनी संताप व्यक्त केला आहे. उंबर, वड आणि पिंपळ या अक्सिजन देणारी वृक्षांची



आर्ध्यातून कत्तल केली जात आहे. या वृक्षांवर असणाऱ्या पक्षांची अधिवास स्थाने संपुष्टात येत असल्याचा संताप आबा रणवरे यांनी व्यक्त केला आहे.

वृक्षांची छाटणी केलेल्या झाडांच्या फांद्या चार–चार दिवस पदपथावर जैसे थे असतात. या फांद्या वेळीच उचलल्या जात नसल्याने रहदारीस अडथळा निर्माण होतो तसेच झाडांच्या फांद्या छाटून पदपथावर टाकल्या जात असल्याने नागरिकांना ये–जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे. काही फांद्या डेब्रिज असलेल्या जागी टाकल्या जात असल्याने त्या ठिकाणी अस्वच्छता निर्माण होत असल्याने नेरूळ विभाग अधिकाऱ्यांनी वेळीच फांद्या हटवण्याची कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## फुंडे विद्यालयात शाहू महाराजांना अभिवादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तु. ह. वाजेकर विद्यालयात सोमवारी (दि. २७) राजर्षी शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शालेय परीपाठानंतर विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्या सुनिता वर्तक, पर्यवेक्षक जी. सी. गोडगे, एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्प्रमुख कुटे आदींच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील पंखुडी मौर्य, स्नेहल थोरात, अश्विनी करांडे, श्रीया म्हात्रे, प्राची घरत या विद्यार्थिनींनी शाहू महाराजांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली.

मराठी विषयतज्ञ आर. जी. शेळके यांनी शाहू महाराजांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. इयत्ता दहावी 'अ' च्या वर्गाने हा कार्यक्रम सादर केला. निधी ठाकूर या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.




## पालक व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर शिबिर

### माजी खासदार संजीव नाईक यांची प्रमुख उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

जीवन विद्या मशीन आणि एम्बिशन ट्युटोरिअल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उत्कर्ष विद्यार्थ्यांचा संकल्प जीवनविद्येचा' या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी पालक यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी या कार्यक्रमास ठाण्याचे माजी खा. संजीव नाईक साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात विद्यार्थी आणि पालक यांना मार्गदर्शन करताना आपल्या जीवनात यशस्वी होत असताना आपणास नशिबावर अवलंबून न राहता यश संपादन करण्यासाठी कठोर मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्न केले तर आपणास कोणतीही गोष्ट अवघड नाही असे सांगितले तसेच सर्व विद्यार्थ्यांनी बालकांसाठी यशस्वी



जीवनाचा कानमंत्र त्यांनी आपल्या भाषणातून दिला.

नाईक कुटुंबीय जीवन विद्या मिशन यांच्या कार्यक्रमांसाठी नेहमीच सर्वतोपरी सहकार्य करीत असून इथून पुढेदेखील त्यांना सहकार्य करणार असल्याचे सांगितले युवा पिढीला घडविण्याचे मोठे काम या मिशनच्या माध्यमातून चालत असून हे राष्ट्र, ही तरुण पिढी चांगल्या विचारांनी बळकट करण्याचे काम आपल्या माध्यमातून चालत आहे आणि त्यास आमच्या शुभेच्छा कायम राहतील, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात विविध विषयावर प्रमुख वक्त्या अल्पना काळोखे व वैशाली राणे यांनी मुलांच्या आणि पालकांच्या मनातील भविष्याबद्दलच्या अनेक समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास कल्पना नाईक, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका वैजयंती भगत, जीवन विद्या नवी मुंबई मिशनचे प्रमुख कार्यकर्ते वंदना पठाडे, राजेंद्र देशमुख, मंगेश वालकर, विजय नलावडे, जीवविद्या मिशनचे सर्व युवा पदाधिकारी तसेच प्रताप महाडिक, संतोष मोरे, प्रशांत महाडिक, अश्विनी महाडिक, कमलेश मुळीक, शिवाजी राजिवडे, शुभांगी चिकणे, वासंती महाडिक, प्रमोद फडतरे, मंडलिक सर्व विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीताफळाची आवक घटली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाला सुरुवात झाल्यानंतर बाजारात सीताफळाचा हंगाम सुरू होतो, मात्र यावर्षी राज्यात तुरळक पाऊस होत असल्याने सीताफळाच्या उत्पादनावर त्याचा परिणाम दिसत आहे. लहान आकारची फळे बाजारात येत असून आवकही कमी आहे.जूनअखेर, जुलै महिन्यात सुरुवातीला मुंबई कृषी उत्पन्न बाजारात सीताफळाची आवक होते. ऑगस्टमध्ये आवक वाढून सप्टेंबर ते ऑक्टोबरपर्यंत सीताफळाचा हंगाम असतो.



यावर्षी जून महिना संपत आला तरी चांगला पाऊस झालेला नाही. तुरळक पावसाच्या सरी बरसत आहेत. त्यामुळे सीताफळ पिकावर परिणाम होत आहे. बाजारात सध्या तुरळक २०० ते ३०० क्रेट सीताफळ आवक होत आहे. तसेच पुरेसा पाऊस नसल्याने सीताफळाची वाढ होत नसल्याने लहान आकारची फळे आहेत. पावसावरच सीताफळाची वाढ अवलंबून असते असे येथील व्यापाऱ्यांनी सांगितले.

सीताफळाचे पुणे व नगर जिल्ह्यातून आवक होत असते. सध्या बाजारात पुणे येथील सीताफळ आवक सुरू झाली आहे. सीताफळ परिपक्व होण्यासाठी चार ते साडेचार महिन्यांचा कलावधी लागतो. पावसाचे प्रमाण कमी असल्याने पिकाला पोषक वातावरण उपलब्ध होत नाही. परिणामी पीक उत्पादन घेण्यास विलंब होतो. सध्या घाऊक बाजारात सीताफळ ३० ते १०० रुपये प्रतिकिलो दराने सीताफळ उपलब्ध आहेत.

## चिरनेर स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांची दिल्ली येथे सहल

**उरण : वार्ताहर**

सेकंडरी स्कूल चिरनेर येथील दहावीच्या १९८५ ग्रुपची नुकतीच दिल्ली येथे सहल जाऊन आली. दिल्ली येथील कुतुबमिनार, अक्षरधाम मंदिर, वृंदावन येथील रंगनाथ मंदिर, मथुरा येथील श्रीकृष्ण जन्मभूमी, फत्तेपुर सिक्रि येथील राजवाडा, बुलंद दरवाजा, आग्रा येथील ताजमहाल, लाल किल्ला या स्थळांना भेटी देण्यात आल्या.

या सहलीमध्ये धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे पाहिली. ३३ वर्षांनंतर व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून सर्व वर्गमित्र एकत्र आले. २०१८ साली पहिले गेट टू गेदर झाले. चिरनेर परिसरातील वर्गातील विद्यार्थ्यांचे हे पहिले गेट टू गेदर होते.

या सहलीमध्ये २५ जण होते. रेखा ट्रॅव्हलर्स कडून या सहलीचे उत्तम नियोजन करण्यात आले होते. सहल, गेट२गेदर या आनंदाच्या क्षणाबरोबर ग्रुपमधील एखाद्याच्या अडीअडचणीला आणि दुःखाच्या प्रसंगी हे मित्र सदैव हजर असतात.



# निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी हताश

## पोलादपुरात ऊन-पावसाचा खेळ कायम



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या दहा दिवसांपासून पाऊस एक-दोन दिवसाआड हजेरी लावत आहे. ऊन- पावसाच्या या खेळात भाताच्या रोपांवर विपरीत परिणाम होण्याची भीती निर्माण झाल्याने काही भागातील शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. निसर्गाच्या या लहरीपणामुळे भातशेतीचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

गेल्या १०-१५ दिवसांपासून पोलादपूर तालुक्यात पावसाची हजेरी आणि गैरहजेरी शेतकऱ्यांच्या अंगातून घामाच्या धारा काढून नांगरणी सुरू करण्यास भाग पाडत आहे. नांगरताना जमिनीत ओलावा असायला पाहिजे म्हणून रस्त्यालगतच्या पावसाच्या पाण्याचे लोट पीव्हीसी पाइपाचे तुकडे गोळा करून शेतात वळविण्याचा जुगाडही काही शेतकऱ्यांनी केलेला दिसून येत आहे. रात्री पाऊस पडला, तर सकाळी शेतात उतरायचे आणि दुपारी पाऊस पडला तर लगेचच नांगर हाती धरण्याचा मनसुबा आखलेले शेतकरी मेहनतीला सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यात गेल्या काही वर्षांमध्ये अतिवृष्टीमुळे नद्या-नाल्यांशेजारील शेतजमिनी वाहून जाणे, डोंगर उतारावरील शेतजमिनी अथवा दरडी वाहून येणे आणि खालील बाजूच्या शेतजमिनींमध्ये दरडीचा मलबा साठणे, रानडुक्करांच्या कळपांकडून शेतीची नासधूस केली जाणे, अवर्षण काळामुळे दुबार पेरणी करावी लागणे, पाऊस लांबल्याने भातपिकाच्या लोंब्या जमिनीवर कोसळून त्यातून पुन्हा अंकूर फुटण्याच्या घटना होणे, लष्करी अळी आणि किडींची टोळधाड येऊन पिक रातोरात फस्त करणे अशा अनेक वेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागले आहे. याखेरिज, भाताची कापणी उशिरा केल्यास लोंबीच्या टोकाचे चांगले भरलेले दाणे शेतात गळून पडतात. भात कांडपाच्या वेळी कणीचे प्रमाण वाढते. पेंढ्याची प्रत खालावते आणि पेंढा कमी मिळतो. संपूर्ण हंगामात शेतीमध्ये राबूनही हाती काही येत नसल्याने शेतकऱ्यांची मानसिकता खचत जात असल्याचे दिसून आले आहे.

भातपिक विमा योजना काढलेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळू शकते, मात्र पोलादपूर तालुक्यातील शेतकरी आजमितीस भातपिक विमा योजनेबाबत सतर्क झाला नसल्याने शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्याच्या शासकीय योजना अस्तित्वात येण्याची गरज निर्माण झाली आहे.

### शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी

# जिल्ह्यात मिशन झिरो ड्रॉपआऊट



(संग्रहित छायाचित्र)

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून ५ ते २० जुलै या कालावधीत मिशन झिरो ड्रॉपआऊट राबवले जाणार आहे. या अंतर्गत शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन शाळांतील विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली आहे.


मिशन झिरो ड्रॉपआऊट योजनेअंतर्गत विविध स्तरावर समित्या आणि समन्वकांची नेमणूक करण्यात आली आहे. या मोहिमेत ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिकेतील जन्म-मृत्यू कागदपत्रांचा आधार घेऊन कुटुंबाचे सर्वेक्षण केले जाईल, तसेच तात्पुरत्या स्थलांतरित कुटुंबातील मुलांची, मूळ वस्तीतून अन्य वस्तीत स्थलांतरित होणाऱ्या मुलांची, अन्य वस्तीतून शाळा वस्तीत स्थलांतरित होणाऱ्या मुलांची माहिती घेतली जाईल. ग्रामस्तरावरील समितीने प्रत्येक घरी जाऊन गावातील प्रत्येक मूल शिक्षणाच्या प्रवाहात दाखल होईल, याची काळजी घेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. शिक्षण विभागासह महसूल, ग्रामविकास, नगरविकास, सामाजिक न्याय, महिला आणि बालविकास, कामगार विभाग, आदिवासी विभाग, अल्पसंख्यांक विभाग, गृह आणि आरोग्य विभागाचा या उपक्रमात सहभाग आहे.

शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी मार्च २०२१ आणि त्या पूर्वीही सर्वेक्षण करण्यात आले होते. कोरोना काळात विद्यार्थी शाळा सोडत असल्याचे, शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले. वाढत्या स्थलांतरामुळे शाळाबाह्य मुलांचे, विशेषतः मुलींचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. अपंग मुलांसमोरील आव्हाने वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या शोधासाठी मोहीम हाती घेण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यात शाळाबाह्य अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे.

**सर्वेक्षण करण्यात येणारी ठिकाणे**

घरोघरी जाण्यासह बस स्थानक, रेल्वे स्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंबे, मागास, वंचित, अल्पसंख्याक गटातील वस्त्या, राज्यातील सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षण गृह, विशेष दत्तक संस्था आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या नोंदी करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

## पालीतील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचा वर्धापन दिन उत्साहात



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने पालीतील श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास केंद्राचा दहावा वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

पालीतील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात विविध आध्यात्मिक सेवा घेण्यात येतात. येथे श्री स्वामींची रोज त्रिकाल आरती होते, तसेच वर्षातून दोन वेळा सप्ताह आयोजित केला जातो. परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने ज्ञान भंडारच्या माध्यमातून आयुर्वेदिक औषधे, आध्यात्मिक, सणवार तसेच कृषी विषयक माहिती देणारे मासिक अंक उपलब्ध केले जातात. वर्धापन दिनाच्या दिवशी श्री स्वामी समर्थ केंद्राचे विश्वस्त मंडळ आणि सेवेकऱ्यांनी श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित केली होती. पुजेनंतर श्री स्वामी समर्थ चरित्राचे सामुदायिक पारायण झाले. हा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी विश्वस्त मंडळ सदस्य, सेवेकरी व श्री स्वामी समर्थ नगरातील रहिवाशांनी सक्रिय सहभाग घेतला.

## खोपोलीतील पेट्रोल पंपात ग्राहकांशी उद्धट वर्तन

### पुरवठा विभागाने तपासणी करण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**


नगरपालिकेच्या जागेत भाडे तत्वावर सुरू असलेला खोपोली गावातील पेट्रोल पंप वारंवार बंद असतो आणि तो सुरू असलाच तर तेथील कर्मचाऱ्यांच्या उद्धट भाषेमुळे ग्राहक वैतागले असून पुरवठा विभागाने त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

खोपोलीतील नागरिकांना पेट्रोल आणि डिझेलसाठी खोपोली फाटा येथे जाण्याचा त्रास कमी व्हावा, या हेतूने नगरपालिकेच्या वसाहतीजवळ एस्सार पेट्रोल पंप सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लोकवस्तीनजिक असल्याने नागरिकांना धोकादायक म्हणून विरोध असताना इंधनासाठी वळसा नको म्हणून काही प्रमाणात दुर्लक्ष केले गेले, परंतु हा पेट्रोल अनेक वेळा बंद असतो. शिवाय तेथील कर्मचाऱ्यांच्या उद्धट वर्तनाचा नागरिकांना वारंवार अनुभव येत आहे. याविषयी मनसेच्या रस्ते साधन, सुविधा व आस्थापना विभागाच्या वतीने खोपोलीचे मुख्याधिकारी अनुप दूरे यांच्याकडे निवेदनदेखील देण्यात आले आहे. तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाने चौकशी करून योग्य कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

**नागरिकांच्या तक्रारी असल्यास खोपोली गावातील पेट्रोल पंपाची तपासणी करण्यात येईल. तपासणीसाठी त्या पेट्रोल पंपात कर्मचारी पाठवू.**
**-राजश्री जोगी,**
**नायब तहसीलदार, खालापूर**

# आज ऑनलाइन रोजगार मेळाव्याचे आयोजन

## इच्छुकांनी लाभ घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन




**अलिबाग : जिमाका**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्ताने रायगड जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत जिल्ह्यातील कुशल व अकुशल उमेदवारांसाठी गुरुवारी (दि. ३०) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत ऑनलाइन रोजगार मेळावा आयोजन करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील ज्या उमेदवारांनी https://www.rojgar.mahaswayam.gov.in या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या वेबपोर्टलवर यापूर्वीच नोंदणी केलेली असेल तर या वेबपोर्टलवरील Employment-Job Seeker (Find a Job)- गेलीशशझ्ञशी डेसळप यामध्ये आपला नोंदणी क्रमांक म्हणजेच युजर आयडी व पासवर्ड वापरुन नोंदणीतील आपली सर्व माहिती अद्यावत करावी. तसेच ज्या उमेदवारांनी या विभागाच्या वेबपोर्टलवर नोंदणी केलेली नाही त्यांनी https://www.rojgar.mahaswayam.gov.in या वेब पोर्टलवर Employment-Job Seeker (Find a Job)-Register या ऑप्शन्सवर क्लिक करून सर्व अद्यावत माहिती भरून नवीन नोंदणी करावी, नोंदणी झाल्यानंतर नोंदणी करताना भरलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर उमेदवारास प्राप्त झालेला नोंदणी क्रमांक व पासवर्ड वापरून वेबपोर्टलवरील Employment-Job Seeker (Find a Job)- Jobseeker Loginमध्ये Registration Id (नोंदणी क्रमांक) व पासवर्ड भरुन Login वर क्लिक करावे. त्यानंतर दिसणाऱ्या आपल्या नोंदणीच्या माहितीतील Pandit Dindayal Upadhyay Job Fair वर क्लिक करुन दिसणाऱ्या रोजगार मेळाव्यांच्या यादीतील आपला जिल्हा निवडून action-view details मध्ये रोजगार मेळाव्याची माहिती पहावी व vacancy listing मध्ये Terms and Conditions मधील I agree वर क्लिक करुन रिक्त पदांची माहिती पहावी व Apply ऑप्शनवर क्लिक करावे त्यानंतरच ऑनलाईन रोजगार मेळाव्यातील आपला सहभाग पूर्ण होईल.

आपण रिक्त पदांकरीता Apply वर क्लिक केल्यानंतर संबंधीत उद्योजकास वेबपोर्टलवर इच्छुक उमेदवारांची शैक्षणिक, व्यावसायिक इत्यादी माहिती प्राप्त होते. त्यामुळे त्यांच्याकडील रिक्त पदांकरीता ऑनलाईन पद्धतीने मुलाखत घेण्याकरिता आपणाशी संपर्क साधणे शक्य होते, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अ. मु. पवार यांनी दिली असून संबंधितास काही समस्या असल्यास कार्यालयाचा दूरध्वनी (क्रमांक ०२१४१-२२२०२९) वर संपर्क साधावा, असे आवाहनही केले आहे.

## वडखळ येथील मोबाइल चोरट्यास पोलिसांकडून अटक



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील वडखळ पोलीस ठाणे हद्दीतील बापदेववाडी येथील नरेश म्हात्रे यांच्या चाळीत मोबाइल चोरी करणाऱ्या चोरट्यास पोलिसांनी अटक केली आहे.

अशोक राम केवल (रा. बापदेववाडी, वडखळ, ता. पेण) यांच्या घराच्या उघड्या दरवाजातून सोमवार (दि. २७) मध्यरात्रीच्या सुमारास समीर उमर खान (रा. नौपाडा, कळंबोली, ता. पनवेल) याने घरात प्रवेश केला व अशोक यांचा १५ हजार रुपये किमतीचा मोबाइल सिमकार्डसह चोरून नेला, मात्र तो पळून जाताना त्यास फिर्यादी व साक्षीदार यांनी पकडले. या वेळी समीरने मोबाइल जमिनीवर आपटून तो पळून गेला. आरोपी समीर उमर खान याला त्याच दिवशी सायंकाळच्या सुमारास अटक करण्यात आली आहे. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक स्वप्नील थळे करीत आहेत.

## घरातून निघून गेलेल्या मुलीचा चार तासात शोध

### माणगाव पोलिसांनी केले पालकांच्या स्वाधीन



(छाया : सलीम शेख)


**माणगाव : प्रतिनिधी**

घरातून निघून गेलेल्या एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा चार तासांच्या आत शोध घेऊन माणगाव पोलिसांनी तिला तिच्या पालकांच्या स्वाधीन केले.

माणगाव तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे राहणाऱ्या मंगला संदिप वाघमारे (वय २८) यांनी त्यांची मुलगी तेजश्री संदिप वाघमारे (वय १३) ही सोमवारी (दि. २७) दुपारी घरात कोणालाही काही न सांगता कोठेतरी निघून गेली असल्याबाबतची तक्रार मंगळवारी (दि. २८) पोलीस ठाण्यात दिली होती. सहाय्यक फौजदार कुवेस्कर आणि त्यांच्या पोलीस सहकाऱ्यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तेजश्री ही तिच्या परिचयातील अर्जुन याच्या सोबत आंबेत कोकरे गावी असल्याची माहिती मिळवली. व तेथे जाऊन तिला ताब्यात घेतले आणि अवघ्या चार तासांच्या आत तेजश्रीला तिच्या पालकांच्या ताब्यात सुखरुपपणे सोपविले.

## कर्जतचे चित्रकार सुनील परदेशींना 'सिग्नेचर मेंबर' चा बहुमान





**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील चित्रकार सुनील परदेशी यांची न्यूयॉर्कमधील पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या आंतरराष्ट्रीय कला-संस्थेकडून 'सिग्नेचर मेंबर' म्हणून निवड करण्यात आली आहे. हा सन्मान मिळवणारे ते भारतातील दुसरे चित्रकार ठरले आहेत.

पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या संस्थेची स्थापना फ्लोरा बी गिफुनी यांनी १९७२मध्ये केली. ही संस्था अमेरिकेतील सर्वात जुनी पेस्टल सोसायटी आहे. न्यूयॉर्कमधील पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या आंतरराष्ट्रीय कला-संस्थेकडून सुनील परदेशी यांची 'सिग्नेचर मेंबर' म्हणून निवड करण्यात आली आहे. यापूर्वी कर्जतचे जागतिक दर्जाचे ख्यातनाम चित्रकार पराग बोरसे यांना हा बहुमान मिळाला आहे.

कर्जत शहरातील चित्रकार सुनील परदेशी हे चिक्की उत्पादनाचा व्यवसाय करतात. त्यांनी कलेचे शिक्षण बांद्रा-मुंबईतील रहेजा स्कूल ऑफ आर्टमध्ये घेतले असून त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन मुंबई, पुणे येथे झाली आहेत. त्यांची अनेक चित्रे सातासमुद्रापार गेली आहेत. त्यांना रंगवली काढण्याचा छंद आहे.

**पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका याचा सन्माननीय सदस्य हा सन्मान माझ्या एकट्याचा नसून माझे कुटुंबिय व सर्व हितचिंतकांचा सन्मान आहे. येणाऱ्या काळात, उत्तमोत्तम कलाकृती सादर करण्याचा व सर्व रसिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीन.**
**-सुनील परदेशी, चित्रकार, कर्जत**

## म्हसळा बाजारात बहुगुणी आवळा दाखल



(छाया : संजय खांबेटे)

**म्हसळा : प्रतिनिधी**

स्थानिक बाजारात रानभाज्या आल्या आहेत, तर त्यात भर घालणारा बहुगुणी आवळा म्हसळा बाजारात दाखल झाला आहे. आवळा सेवनाने रोगप्रतिकार शक्ती वाढत असल्याने बाजारात मागणी बऱ्यापैकी वाढली असल्याचे स्थानिक भाजी विक्रेते अशोक अडागळे यांनी सांगितले. इतर शहरात १०० ते १२० रुपये प्रति किलो दराने मिळणारा आवळा म्हसळा शहरात केवळ ७० ते ८० रुपये प्रति किलो दराने मिळत आहे.

बाजारात स्वस्त आणि सहज उपलब्ध असणाऱ्या आवळा या फळाचे अनेक फायदे आहेत. त्यासाठी पौष्टिक आहारात किमान रोज एक आवळा खाणे आवश्यक आहे. तज्ज्ञ डॉक्टरही रोगप्रतिकार शक्ती कमी असलेल्यांना आवळा खाण्याचा सल्ला देतात. चवीला आंबट, तुरट आणि थोडासा गोड असा आवळा अनेकांना आवडतो. पूर्वी शाळेजवळ चिंचा-कैरी विकणाऱ्यांकडे आवळा आवर्जून असायचा. दीर्घायुष्य लाभण्यासाठी आवळ्याचा आहारात आणि औषधी द्रव्य म्हणून उपयोग करतात. आवळ्यामध्ये 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असते. आवळ्याच्या सेवनाने शरीर शुद्ध होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढते. डोके शांत राहते, तसेच केसांच्या तक्रारीही दूर होतात. केस गळत असतील तर आवळ्याच्या तेलाने केसांच्या मुळाशी मालिश करावे. ज्यांना पित्ताचा त्रास आहे त्यांनी सकाळी 'मोरावळा' खाल्ल्यास फायदेशीर ठरेल आवळ्यामध्ये क्रोमियम नामक घटक असतो. हा घटक शरीरातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी करण्यास मदत करतो. हा घटक हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी उपयोगी पडतो. अनेक महिला आवळ्यापासून सरबत, पावडर, लोणचे (आंबट-गोड) मोरावळा, चटणी, कँडी असे बहुविध प्रकार करतात.

## पेणमध्ये लॅपटॉपची चोरी

**पेण : प्रतिनिधी**

महावितरणच्या पेण कार्यालया शेजारी राहणाऱ्या विजय भागवत यांच्या घरातून रविवारी (दि. २६) सकाळी अज्ञात चोरट्याने लॅपटॉपसह अन्य इलेक्ट्रॉनिक वस्तू असा एकूण ५३ हजार रुपयांच्या ऐवज चोरून नेला.

विजय भागवत यांच्या घराच्या उघड्या दरवाजातून रविवारी सकाळी अज्ञात चोरट्याने प्रवेश करुन ते वापरत असलेला टॅब, मोबाइल, लॅपटॉप व पॉकेट अशा एकूण ५३ हजार रुपये किंमतीच्या वस्तू चोरुन नेल्या. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार पाटील करीत आहेत.

# भारतीय संघाचा आयर्लंडवर दमदार विजय



## दीपक हुडा व संजू सॅमसन ठरले विजयाचे शिल्पकार

**ड्युब्लिन : वृत्तसंस्था**

भारत आणि आयर्लंड यांच्यात दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना ड्युब्लिनमधील द व्हिलेज स्टेडियमवर खेळवण्यात आला. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेला हा सामना भारताने चार धावांनी जिंकला. या विजयासह भारताने दोन सामन्यांची मालिका २-० अशी जिंकली आहे. शतकवीर दीपक हुडा आणि अर्धशतकी खेळी केलेला संजू सॅमसन हे भारताच्या विजयाचे शिल्पकार ठरले.

भारतीय कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. दीपक हुड्डाचे धडाकेबाज शतक आणि संजू सॅमसनच्या अर्धशतकाच्या बळावर भारताने २० षटकांमध्ये सात गडी गमावून २२७ धावा केल्या. दीपक हुडा आणि संजू सॅमसन यांनी दुसऱ्या गड्यासाठी विक्रमी १७६ धावांची भागीदारी केली. या दरम्यान दीपकने ५७ चेंडूत १०४ धावा केल्या आहेत. त्याने आपल्या या खेळीत ९ चौकार आणि ६ षटकार फटकावले. तर, संजू सॅमसनने ४२ चेंडूत ७७ धावा केल्या.

दीपक हुडाने आयर्लंडविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात शतक झळकावत रोहित शर्माच्या क्लबमध्ये प्रवेश मिळवला. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये भारतासाठी शतक झळकावणारा तो चौथा खेळाडू ठरला. त्याच्यापूर्वी केएल राहुल, रोहित शर्मा, सुरेश रैना यांनी शतके झळकावली आहेत.

भारताने दिलेले २२८ धावांचे आव्हान पार करण्यासाठी उतरलेल्या आयर्लंडने शेवटपर्यंत जोरादार टक्कर दिली. सलामीवीर पॉल स्टर्लिंग आणि कर्णधार अँड्र्यू बालबर्नी यांनी संघाला आश्वासक सुरुवात मिळवून दिली, मात्र स्टर्लिंग ४० धावा करून बाद झाल्याने ही जोडी फुटली. त्यानंतर आलेला गॅरेथ डेलानी शून्यावर माघारी परतला. यादरम्यान, कर्णधार अँड्र्यूने आपले अर्धशतक पूर्ण केले. हॅरी टेक्टरने २८ चेंडूत ३९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करून भारतीय संघाची चिंता वाढवली. शेवटी मैदानावर असलेल्या जॉर्ज डॉकरेल आणि मार्क अडायर या जोडीने शानदार फटकेबाजी करीत सामना रंगतदार स्थितीमध्ये आणून ठेवला.

शेवटचे षटक टाकण्यासाठी कर्णधार हार्दिक पांड्याने आपला दुसराच आंतरराष्ट्रीय सामना खेळणाऱ्या उमरान मलिकवर विश्वास दाखवला. आपल्या वेगवान माऱ्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या उमरानने कर्णधाराचा विश्वास सार्थ करून दाखवत संघाला विजय मिळवून देण्यात मदत केली. भारताने दोन सामन्यांची मालिका २-०ने जिंकली. भारताचा हा या वर्षातील सलग पाचवा व्हाईट वॉश ठरला आहे.

## मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत प्रणॉयची आगेकूच



**क्वालालम्पूर : वृत्तसंस्था**

भारताच्या एचएस प्रणॉयने मंगळवारी (दि. २८) मलेशियाच्या डॅरेन लीववर संघर्षपूर्ण विजय मिळवत मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष एकेरीची दुसरी फेरी गाठली. बी साईप्रणीत आणि समीर वर्मा यांचे आव्हान मात्र संपुष्टात आले. जूनच्या पूर्वार्धात इंडोनेशिया खुल्या स्पर्धेची उपांत्य फेरी गाठणाऱ्या प्रणॉयने डॅरेनविरुद्धची लढत ६२ मिनिटांत २१-१४, १७-२१, २१-१८ अशा फरकाने जिंकली. प्रणॉयची पुढील फेरीत चायनीज तैपेईच्या चौथ्या मानांकित चोऊ टीन चेनशी गाठ पडणार आहे.

साईप्रणीतने जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावरील इंडोनेशियाच्या ॲन्थनी सिनिसुका गिनटिंगविरुद्ध १५-२१, २१-१९, ९-२१ अशी हार पत्करली, तसेच समीरने जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावरील जोनाटन ख्रिस्टीकडून १४-२१, २१-१३, ७-२१ असा पराभव पत्करला.

महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि सिक्की रेड्डी यांचीही वाटचाल संपुष्टात आली. नामी मात्सुयामा आणि चिहारू शिदा यांनी या जोडीला २१-१५, २१-११ असे नामोहरम केले.

# रोहित शर्मा कसोटी सामन्याला मुकणार

## बुमराहकडे नेतृत्व

**इंग्लंड : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यामध्ये बर्मिंगहॅम येथे १ जुलैपासून एकमेव कसोटी सामना खेळल्या जाणार आहे. कसोटी सामन्यापूर्वी कर्णधार रोहित शर्मा कोरोना पॉझिटिव्ह आला होता. कसोटीत त्याच्या खेळण्याबाबत तसेच भारताचे कर्णधार कोण असेल, याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात होते. इंग्लंडविरुद्ध पाचव्या कसोटीला रोहित शर्मा मुकणार असून जसप्रीत बुमराह भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार संघाच्या बैठकीत त्यांनी याबाबत माहिती दिली आहे.

पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारत २-१ ने आघाडीवर आहे. एक विजय किंवा बरोबरी देखील त्यांना मालिका जिंकण्यास मदत करेल, पण जागतिक कसोटी चॅम्पियनशिप साठी नक्कीच महत्त्वपूर्ण आहे. लीसेस्टरशायर विरुद्धच्या सराव सामन्यादरम्यान रोहित शर्माची कोविड-१९ चाचणी पॉसिटीव्ह आली होती, ज्यामुळे तो सामन्याच्या दुसऱ्या डावाला मुकला होता. भारतीय संघ व्यवस्थापनाला आशा आहे की तो कसोटीसाठी



वेळेत तंदुरुस्त होईल, परंतु जर तो सावरला नाही तर भारतासाठी ही कठीण परिस्थिती असेल, असे सांगण्यात येत आहे.

गेल्या वर्षी भारतीय संघ पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंडला गेला होता, मात्र चार सामन्यांनंतर भारताचे काही खेळाडू आणि प्रशिक्षकांना कोरोनाची लागण झाल्याचे आढळून आले. अशा स्थितीत टीम इंडियाने चार कसोटीनंतर पाचवी कसोटी खेळण्यास नकार दिला.

रोहितने त्या चार कसोटी सामन्यांमध्ये ५२.२७च्या सरासरीने ३६८ धावा केल्या, त्यात ओव्हलवरील शतकाचा समावेश आहे. आता त्या मालिकेतील पाचवा सामना १ ते ५ जुलै दरम्यान खेळवला जाणार आहे. पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघ सध्या २-१ने आघाडीवर आहे.

# इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड कसोटी सामन्यादरम्यान प्रेक्षकांमध्ये हाणामारी

**हेडिंग्ले : वृत्तसंस्था**

हेडिंग्ले येथे झालेल्या इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड कसोटी सामन्यात एकाच देशाच्या क्रिकेट चाहत्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. तिसरा कसोटी सामना बघण्यासाठी उपस्थित असलेल्या ब्रिटिश प्रेक्षकांची आपापसांतच मारामारी जुंपल्याचा एक व्हिडिओ समोर सोशल मीडियावर सध्या प्रचंड व्हायरल होत आहे.

हेडिंग्ले येथे झालेल्या इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड कसोटी सामना बघण्यासाठी स्टेडियममध्ये प्रेक्षकांनी



मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. सामना सुरू असताना अचानक काही चाहत्यांमध्ये वाद सुरू झाला. या वादाचे रुपांतर हाणामारीमध्ये झाले. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ब्रिटिश चाहते एकमेकांना लाथा-बुक्क्यांनी मारत असल्याचे, या व्हिडिओमध्ये दिसत आहे. जगभरताली क्रिकेट चाहते या व्हिडिओवर मजेशीर कमेंट करीत आहेत.

हेडिंग्ले कसोटी सामन्यामध्ये इंग्लंडच्या संघाने शानदार खेळ करत न्यूझीलंडचा सात गडी राखून पराभव केला. या विजयासोबतच इंग्लंडने न्यूझीलंडला तीन सामन्यांच्या मालिकेत व्हाईट वॉश दिला. ज्यावेळी मैदानावर इंग्लंडचे खेळाडू शानदार खेळ करीत होते, त्याचवेळी चाहते मात्र, आपापसांत भांडण्यात व्यस्त होते.

# सेरेना विल्यम्स सलग दुसऱ्या वर्षी पहिल्याच फेरीत बाद

**लंडन : वृत्तसंस्था**

तब्बल सात वेळा विम्बल्डन आपल्या नावावर करणारी अमेरिकेची स्टार टेनिसपटू



सेरेना विल्यम्सला सलग दुसऱ्या वर्षी पहिल्याच फेरीत बाद झाली. मंगळवारी (दि. २८) सेंटर कोर्टवर रात्री उशिरा झालेल्या सामन्यात फ्रेंचच्या पदार्पण करणाऱ्या हार्मोनी टानने सेरेना विल्यम्सचा पराभव केला.


गेल्या वर्षी सेरेना विल्यम्सला विम्बल्डनमधून दुखापतीमुळे सामना अर्धवट सोडून माघार घ्यावी लागली होती. त्यावेळीच ही तिची विम्बल्डनमधील शेवटची मॅच ठरते का, अशी शंका उपस्थित केली जात होती, मात्र तिने पुनरागमन केले, परंतु पहिल्याच फेरीत ११५ व्या रँकवर असणाऱ्या टानने तिला ७-५, १-६, ७-६(७) असा पराभवाचा धक्का दिला. विशेष म्हणजे हार्मोनी टान ही यापूर्वी विंबल्डनचा मेन ड्रॉ कधीही खेळली नव्हती.

# विम्बल्डन टेनिस स्पर्धेत अल्कराझचा विजय

**लंडन : वृत्तसंस्था**

पाचव्या मानांकित स्पेनच्या कार्लोस अल्कराझ गार्फियाने विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत विजयाची नोंद केली, तसेच पुरुषांमध्ये तीन ग्रँडस्लॅम विजेता अँडी मरे, यानिक सिन्नर आणि रायली ओपेल्का यांना, तर महिलांमध्ये अग्रमानांकित इगा श्वीऑनटेक आणि मारिया सक्कारी यांनीही दुसरी फेरी गाठली.

१९ वर्षीय अल्कराझने पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीतील चुरशीच्या लढतीत जर्मनीच्या यान-लेनर्ड स्ट्रूफवर ४-६, ७-५, ४-६, ७-६ (७-३), ६-४ अशी सरशी साधली. तब्बल चार तास



आणि ११ मिनिटे रंगलेल्या या लढतीत दोन्ही खेळाडूंनी झुंजार खेळ केला, मात्र पिछाडीनंतर अल्कराझने अखेरचे दोन्ही सेट जिंकत आगेकूच केली, तसेच ब्रिटनचा ३५ वर्षीय खेळाडू मरेने ऑस्ट्रेलियाच्या जेम्स डकवर्थचा ४-६, ६-३, ६-२, ६-४ असा पराभव केला. १०व्या मानांकित इटलीच्या सिन्नरने माजी ग्रँडस्लॅम विजेत्या स्वित्झर्लंडच्या स्टॅनिस्लास वॉविरकावर ७-५, ६-४, ६-३, ६-२ अशी मात केली. १५व्या मानांकित अमेरिकेच्या ओपेल्काने स्पेनच्या कार्लोस ताबेर्नेरला ७-६ (७-५), ६-४, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवले. १८व्या मानांकित ग्रिगोर दिमित्रोव्हला पायाच्या दुखापतीमुळे स्टिव्ह जॉन्सनविरुद्धचा सामना अर्ध्यातच सोडावा लागला. दिमित्रोव्हने पहिला सेट ६-४ असा जिंकल्यानंतर जॉन्सन दुसऱ्या सेटमध्ये ५-२ असा आघाडीवर होता, मात्र त्यानंतर त्याने सामन्यातून माघार घेतल्याने अमेरिकेच्या जॉन्सनला पुढे चाल मिळाली.

दुसरीकडे, फ्रेंच खुल्या स्पर्धेतील विजेत्या श्वीऑनटेकने महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत क्रोएशियाच्या याना फेटचे आव्हान ६-०, ६-३ असे परतवून लावले. पाचव्या मानांकित ग्रीसच्या सक्कारीने ऑस्ट्रेलियाच्या झो हाइव्जला ६-१, ६-४ अशी धूळ चारली. १२व्या मानांकित ओस्तापेंकोने फ्रान्सच्या डोडिनवर ६-४, ६-४ अशी मात केली. याचप्रमाणे ११व्या मानांकित अमेरिकेच्या गॉफने रोमेनियाच्या एलेना-गॅब्रिएला रूसवर ६-२, ६-३, ७-५ असा निसटता विजय मिळवला. चौथ्या मानांकित स्पेनच्या बदोसाने अमेरिकेच्या लुइसा चिरिकोला ६-२, ६-१ असे नमवले.

# ऑलिम्पिक पदक विजेता हॉकीपटूचे निधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ज्येष्ठ भारतीय हॉकीपटू वरिंदर सिंग यांचे मंगळवारी (दि. २८) जलंधरमध्ये निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. भारतीय हॉकीने एकेकाळी फार वैभवशाली



दिवस बघितले होते. भारतीय हॉकीला आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळवून देण्यामध्ये पंजाब आणि हरियाणामधील अनेक खेळाडूंनी आपले योगदान दिले होते. त्यामध्ये ऑलिम्पिक पदक विजेता आणि विश्वचषक विजेता वरिंदर सिंग यांचाही समावेश होता.

हॉकी इंडियाने ट्वीट करून त्यांच्या निधनाची माहिती दिली. सिंग यांच्या निधनाबद्दल हॉकी इंडियाने शोक व्यक्त केला आहे. वरिंदर सिंग यांनी मिळवलेले यश जगभरातील हॉकी समुदाय स्मरणात ठेवेल, असे हॉकी इंडियाने आपल्या एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

वरिंदर सिंग हे १९७५मध्ये क्वालालंपूर येथे झालेल्या पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या भारतीय संघाचा भाग होते. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत भारताचे हे पहिले आणि एकमेव सुवर्ण पदक आहे. तेव्हा भारतीय हॉकी संघाने अंतिम फेरीत कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा २-१ असा पराभव केला होता.










पनवेल : पनवेलमध्ये झालेल्या ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश महिला संपर्क प्रमुख व युवक संपर्क प्रमुखांच्या बैठकीत विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.






हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ❊ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ❊ E-mail : ramprahar@gmail.com ❊ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by Krishna Changu Thakur on behalf of Malhar Network Pvt. Ltd. and Printed at Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra and published from Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale